# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक पहिला





# 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'



**पुणे** : मराठी प्रकाशन व्यवसाय तना-मनात भिनवून अहोरात्र झटणारे कर्तृत्ववान प्रकाशक 'सुनील मेहता' यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या 'साहित्य सृजन पुरस्कारा'चं हे तिसरं वर्ष आहे. प्रकाशक सुनील मेहता यांच्या साहित्यनिर्मितीचा वारसा पुढे नेण्यासाठीच, २०२३पासून **'प्रकाशक सुनील मेहता - साहित्य सृजन पुरस्कारा'**ची सुरुवात झाली आहे. २०२५च्या 'साहित्य सृजन पुरस्कारा'चे विजेते ठरले आहेत- **'शर्मिला फडके'** आणि **'नितीन कोतापल्ले.'**

'नितीन कोतापल्ले' लिखित व 'सायन पब्लिकेशन'तर्फे प्रकाशित 'गुरु' या कादंबरीस 'सर्वोत्कृष्ट कादंबरी' असं पारितोषिक प्राप्त झालं आहे. रुपये तीस हजार आणि मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. तसंच, 'शर्मिला फडके' लिखित व 'मौज प्रकाशन गृह'तर्फे प्रकाशित 'ये शहर बड़ा पुराना है' या कथासंग्रहास 'सर्वोत्कृष्ट कथासंग्रह' असं पारितोषिक प्राप्त झालं आहे. रुपये वीस हजार आणि मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या दालनात १२ जानेवारी, २०२६ रोजी हा कार्यक्रम पार पडला. प्रख्यात चित्रकार 'चंद्रमोहन कुलकर्णी' यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिकं देऊन गौरवण्यात आलं. या वेळी समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुरस्कृत साहित्यकृतींसंबंधी विवेचनही केलं आणि नव-लेखकांना मार्गदर्शनही केलं.

साहित्यनिर्मितीचा ५० वर्षांचा अनुभव असलेल्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस'नं उदयोन्मुख लेखकांसाठी निर्माण केलेली ही संधी इतर प्रकाशकांनाही प्रकाशझोतात आणत आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦जानेवारी २०२६ ♦वर्ष सव्विसावे ♦अंक पहिला

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस


## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **प्रकाशन** | १० |
| **विशेष लेख** | १४ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| डेझर्टर | १६ |
| क्रांतीच्या वाटेवर | २६ |
| व्हिक्टरी सिटी | ३४ |
| धग | ४२ |
| झिंगू लुखूलुखू | ४८ |
| **दिनविशेष** | ६१ |




संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



# संपादकीय

## ‘आनंददायी क्षणप्रत्ययां’चा ग्रंथ-महोत्सव

सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! आपण ‘शुभेच्छा देतो’ म्हणजे नक्की काय करतो? ते केवळ ‘औपचारिक’ शब्द नसतात, तर ‘विशिष्ट सकारात्मक भावना’ आपण त्यातून व्यक्त करतो... खरं ना! अर्थात, फक्त नवीन वर्षच नाही; तर असे अनेक क्षण आपल्या आयुष्यात येतात, जे सकारात्मक ऊर्जा देणारे असतात. तसं पाहता, ते ‘शब्द’च आपल्यासाठी प्रेरणादायी ठरतात. किंबहुना, तुकाराम महाराजांनी म्हटलंच आहे- ‘आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने। शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू। शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन। शब्द वाटू धन जनलोका।।’- या रचनेतून त्यांनी शब्दांचंच महत्त्व स्पष्ट केलं आहे. अशा अनेक रचना, पुस्तकं ही शब्दांद्वारे खूप काही सांगतात आणि आपल्याला वेगळी ऊर्जा व प्रेरणा देतात. या अनुषंगाने, विविध ग्रंथ-महोत्सव त्याचीच प्रतीती देतात. असाच आनंददायी व



ऊर्जादायी क्षणप्रत्यय ग्रंथप्रेमींनी-वाचकांनी नुकताच अनुभवला. निमित्त होतं- 'राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT)'ने आयोजित केलेल्या भव्य ग्रंथ- महोत्सवाचं.

हा ग्रंथ-महोत्सव २२ नोव्हेंबर, २०२५ ते ३० नोव्हेंबर, २०२५ या दरम्यान नागपूर येथे संपन्न झाला होता. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या दालनाला नेहमीप्रमाणेच खूप गर्दी होती. या पुस्तक-महोत्सवातील खास आठवण म्हणजे, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री 'नितीन गडकरी' यांच्या पत्नी 'सौ.कांचन नितीन गडकरी' यांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या दालनाला सदिच्छा-भेट दिली. याप्रसंगी, 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता यांनी सुधा मूर्ती यांचं 'द सर्कल ऑफ लाइफ' हे पुस्तक त्यांना 'भेट' म्हणून दिलं. नागपूर येथील ग्रंथ-प्रदर्शनासंदर्भात 'एनबीटी'चे अध्यक्ष मिलिंद मराठे यांचे मनःपूर्वक आभार.

पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणावर हा ग्रंथ-महोत्सव १३ डिसेंबर, २०२५ ते २१ डिसेंबर, २०२५ या दरम्यान संपन्न झाला. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वतीने या वेळी २६ साहित्यिक सत्रांचा महायज्ञ अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

हे वर्ष 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे लाडके आणि 'बेस्ट-सेलिंग' लेखक शंकर पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या महान लेखकाच्या सन्मानार्थ, महोत्सवाच्या मुख्य मंचाला 'शंकर पाटील मंच' असे नाव देऊन त्यांना मानाचा मुजरा केला गेला. याच मंचावर साहित्याचा हा जागर पार पडला. महोत्सवात- 'लेफ्टनंट जनरल सुदर्शन हसबनीस'लिखित 'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तकाचं प्रकाशन त्यांच्या मातोश्री 'साधना हसबनीस' यांच्या हस्ते करण्यात आलं. तर, ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष व प्रसिद्ध लेखक विश्वास पाटील यांच्या 'अस्मानभरारी' या पुस्तकाचं प्रकाशन प्रसिद्ध अभिनेते प्रवीण तरडे यांच्या हस्ते करण्यात आलं. महोत्सवात- सुषमा शाळिग्राम, मंजूषा आमडेकर, लक्ष्मीकांत देशमुख, एकनाथ आव्हाड, रवि कांत, श्याम

भुर्के, डॉ.संजय ढोले, संजय सिंग, जी.बी.देशमुख, प्रज्ञा ओक, दीपक कुलकर्णी, एस.एल.खुटवड, राजेंद्र खेर, सुनंदा अमरापूरकर आणि रीमा अमरापूरकर, मंजुश्री गोखले, प्रमिला जरग, सुवर्णा नाईक निंबाळकर, गणेश मानुगडे, उमा कुलकर्णी, सुप्रिया विनोद-गणेश मतकरी, मृणालिनी सावंत, समर, राजीव तांबे हे मान्यवर सहभागी झाले होते. सुप्रसिद्ध लेखक अक्षत गुप्ता यांनी महोत्सवाला खास भेट दिली आणि 'बुक साइनिंग' सत्रामुळे वाचकांचा उत्साह शिगेला पोहोचला.महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनीही 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या ग्रंथ-दालनाला सदिच्छा-भेट दिली. या वेळी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता उपस्थित होते.

मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व लोकप्रिय दिग्दर्शक महेश कोठारे ('डॅम इट आणि बरंच काही'), प्रसिद्ध अभिनेते प्रसाद ओक ('माझा आनंद') व राजेशजी पांडे ('गिनीजगाथा') यांच्याशी प्रसिद्ध अभिनेते प्रवीण तरडे यांनी संवाद साधला.'पुस्तक-लेखनप्रवास : नव्या वाटा' या विषयावर रंगलेली ही मैफल रसिकांच्या मनात घर करून गेली.

यंदा 'मेहता पब्लिशिंग हाऊस' आपल्या पन्नासाव्या वर्षात, अर्थात सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. अशा महत्त्वपूर्ण टप्प्यावर, या महोत्सवात मिळालेलं वाचकांचं प्रेम आणि उत्साह पाहून आम्हाला पुढील वाटचालीसाठी प्रचंड नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळेच, शतकपूर्तीकडे वाटचाल करणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलनाकडे आम्ही अतिशय कुतूहलाने पाहत आहोत.

'एनबीटी'च्या पुस्तक-महोत्सवाचे संयोजक राजेशजी पांडे यांचे, तसंच 'एनबीटी'चे संचालक लेफ्टनन्ट कर्नल युवराजजी मलिक आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विशेष आभार. त्याचप्रमाणे, श्री.विश्वास पाटील सरांचेही मनःपूर्वक आभार. आणखी एका व्यक्तीचा- श्री. प्रवीण तरडे सरांचा विशेष उल्लेख आवर्जून करावा लागेल. केवळ एक 'कलाकार' म्हणून नाही; तर या महोत्सवाच्या यशासाठी त्यांनी ज्या तन्मयतेने आणि अफाट मेहनतीने काम केलं, ते खरोखरच कौतुकास्पद

आहे. त्यांचे विशेष आभार.

'एनबीटी'च्या या ग्रंथ-महोत्सवाच्या निमित्ताने वाचकांचा लेखक-प्रकाशकांशी संवादाचा धागा जुळला. साहित्यिक चर्चा व देवाणघेवाण यासाठी हे मोठं व्यासपीठच उपलब्ध झालं. विविध भाषांमधला पुस्तकांचा सहभाग व उपलब्धता यामुळे 'विविधतेतून एकता' ही अनुभूती वाचकवर्गाने घेतली. या महोत्सवाचं सर्वांत मोठं यश म्हणजे, इथे मिळालेला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद. विशेषत्वाने, शालेय विद्यार्थिवर्गाचाही सहभाग वाखाणण्याजोगा होता. एकूणच, शब्दांचं, पुस्तकांचं आणि लेखन-वाचनाचंही महत्त्व यातून अधोरेखित झालं. म्हणूनच, हे महत्त्व अधोरेखित करणारा हा 'एनबीटी'चा ग्रंथ-महोत्सव वैविध्यपूर्ण-वैशिष्ट्यपूर्ण तर होताच; पण सगळ्यांसाठीच तो सर्वार्थाने सकारात्मक ऊर्जादायी ठरला.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

http://www.facebook.com/mehtapublishinghouse


टी बुक क्लब
मेहता
पब्लिशिंग
हाऊस
टी बुक क्लब योजनेतील
'क्लासिक्स'साठी
खास सवलत!
BOOK
CLUB
या क्लबचे सभासद व्हा, आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
₹ १०० भरून
'टी बुक क्लब' यादीतील
कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी
निम्म्या किंमतीत मिळवा.
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची
ग्रंथसूचि पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx
पोस्टेज खर्च अतिरिक्त


नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली,
वाचायला सोपी,
सोयीस्कर
– थेट तुमच्या
कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि
अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook
available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# प्रकाशन

## ‘महासम्राट खंड ३ : अस्मानभरारी’

पुणे : महाराष्ट्राचे आराध्य-दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील कादंबरीमाला ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’ने २०२२पासून प्रकाशित करण्यास सुरुवात केली आहे. ज्येष्ठ लेखक ‘विश्वास पाटील’ हे ‘महासम्राट’ या कादंबरीमालेचे लेखक आहेत. ‘फर्ग्युसन महाविद्यालय पुणे’च्या प्रांगणात आयोजित ‘पुणे पुस्तक-महोत्सव-२०२५’मध्ये ‘मेहता पब्लिशिंग हाऊस’तर्फे ‘महासम्राट’ या कादंबरीमालेतील ‘महासम्राट खंड ३ : अस्मानभरारी’ या तिसऱ्या कादंबरीचे प्रकाशन प्रख्यात ज्येष्ठ लेखक आणि ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ‘विश्वास पाटील’ आणि नामवंत लेखक-दिग्दर्शक-अभिनेते ‘प्रवीण तरडे’ यांच्या हस्ते करण्यात आले.‘‘पुस्तकं वाचताना आपलं भावविश्व तयार होतं. मध्येच वाचन थांबलं, तरी आपण पुन्हा पुस्तकात गुंततो. असे आपण पुस्तकातच गुंतू शकतो.’’ असं विश्वास पाटील यांच्या लेखनशैलीबद्दल प्रवीण तरडे यांनी मत व्यक्त केलं. विश्वास पाटील यांच्या प्रभावी शब्दरचनेमुळे छत्रपतींना नव्याने जाणून घेण्याची

संधी वाचकांना उपलब्ध झाली आहे. या आधी महासम्राट खंड १ : झंझावात आणि महासम्राट खंड २ : रणखैंदळ हे दोन भाग प्रकाशित झालेले आहेत.

‘‘पहिले दोन खंड आल्यानंतर वाचकांच्या प्रेमाच्या धमक्या येऊ लागल्या, की पुढचा खंड लवकर यावा. आपल्या आजवरच्या कादंबऱ्यांमधील ‘अस्मानभरारी’ची इयत्ता वरची आहे’’ असा अनुभव या वेळी लेखक विश्वास पाटील यांनी सांगितला. त्याचबरोबर, या वेळी अखिल मेहता यांनी ‘अस्मानभरारी’ पुस्तकाची निर्मितिप्रक्रिया स्पष्ट केली. ‘महासम्राट’ या कादंबरीमालेतून छत्रपती शिवरायांची समग्र जीवनगाथा मांडली जात आहे. ‘अस्मानभरारी’ या तिसऱ्या खंडात महाराजांची बसरूर स्वारी, मिर्झाराजे जयसिंगाचे आक्रमण आणि शिवरायांची आग्र्याहून सुटका हा कालपट वाचकांसमोर येतो.

दीर्घकाळाच्या विश्रांतीनंतर ‘महासम्राट खंड ३ : अस्मानभरारी’ वाचकांच्या पसंतीस उतरलेली महाकादंबरी पुन्हा एकदा सज्ज झालेली आहे आणि तिलाही घवघवीत प्रतिसाद मिळत आहे...

या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता आणि साहिल मेहता उपस्थित होते.

◆



## १२ विश्वविक्रमांची ‘गिनीजगाथा’

पुणे : ‘पुणे पुस्तक महोत्सवा’चे मुख्य संयोजक व आयोजनाचे शिल्पकार ‘राजेश पांडे’लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊसनिर्मित ‘गिनीजगाथा’ या पुस्तकाचं भव्य प्रकाशन १५ डिसेंबर, २०२५ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ‘देवेंद्र फडणवीस’ यांच्या हस्ते करण्यात आलं. १३ ते २१ डिसेंबर या दरम्यान ‘फर्ग्युसन महाविद्यालया’च्या प्रांगणात ‘राष्ट्रीय पुस्तक न्यास’ यांच्यातर्फे ‘पुणे पुस्तक महोत्सव’ आयोजित करण्यात आला होता. ‘‘कोणतंही पुस्तक आपलं ज्ञान व जाणिवा प्रगल्भ करतं. पुस्तक वाचनातून आपल्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक परिणाम होतो.’’ असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केलं. ‘गिनीजगाथा’ या पुस्तकाचा गाभाही अशाच विचारांचं प्रतीक आहे. या विशेष सोहळ्याला राज्याचे मंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील, ‘नॅशनल बुक ट्रस्ट’चे अध्यक्ष श्री. मिलिंदजी मराठे, ‘नॅशनल बुक ट्रस्ट’चे संचालक लेफ्टनन्ट कर्नल युवराजजी मलिक आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री. राजेश पांडे यांनी अखिल भारतीय विद्यार्थी

परिषदेपासून मजल-दरमजल करत केलेली देशसेवेच्या कार्याची सुरुवात, बारा विश्वविक्रमांपर्यंत कशी येऊन पोहोचली, त्याचा सविस्तर लेखाजोखा या पुस्तकातून मांडलेला आहे. हे बारा विश्वविक्रम साकारताना त्यांना प्रत्येक पावलागणिक विविध अडचणींचा सामना कसा करावा लागला आणि हार न मानता एकजूट होऊन प्रत्येक विश्वविक्रम कसा साध्य केला, याची स्थल-कालासहित मांडलेली कहाणीच आहे.  हे पुस्तक केवळ ‘कागदावरचे शब्द’ नसून, मा. राजेशजी पांडे यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली ती एक ‘लोकचळवळ’ आहे, जी आता मेहता पब्लिशिंग हाऊसच्या माध्यमातून कायमस्वरूपी जतन केली गेली आहे.

‘एक स्वप्न... एक संकल्प... आणि हजारो हातांनी लोकसहभागातून घडवलेली गाथा... युवा भारताच्या लोकसहभागाची गाथा- गिनीजगाथा’ सर्व रसिक वाचकांसाठी आशादायीच ठरेल. मेहता पब्लिशिंग हाऊससाठी हा कायमच कृतज्ञतेचा आणि अभिमानाचा क्षण राहील..!

◆



# विशेष लेख

## स्वप्नपूर्तीच्या पाऊलखुणा

मराठी प्रकाशक म्हणून कोल्हापूर ते पुणे असा प्रवास करत मेहता पब्लिशिंग हाऊसचं भव्यदिव्य दालन पुण्यामध्ये स्वकष्टांनी उभं करणारे सुनील मेहता. त्यांच्या स्वप्नाची पूर्ती म्हणून कोल्हापुरातही मेहता पब्लिशिंग हाऊसचं भव्य दालन सुरू होत आहे. कोल्हापुरातल्या त्यांच्या भव्य दालनाची स्वप्नपूर्ती होत आहे. आपल्या प्रभावशाली कामगिरीनं मराठी प्रकाशन व्यवसायावर वेगळा ठसा उमटविणाऱ्या आणि हजारहून अधिक टायटल्सची निर्मिती करत मराठी प्रकाशनविश्वात अढळ असं स्थान निर्माण करणाऱ्या सुनील मेहतांचा जुन्या पद्धतीचं दुकान उभं करण्याला विरोध होता. त्यांची प्रकाशक म्हणून असलेली दूरदृष्टी यातून दिसून येते. आधुनिक उपकरणांनी सज्ज अशी एक शोरूम कोल्हापूरसारख्या विकसनशील शहरात असावी, असं भव्य स्वप्न २०१५पासून ते बघत होते. 'स्वप्नं पूर्ण होतातच' हाच त्यांचा विश्वास आज सार्थ ठरला आहे. त्यांची अनुपस्थिती अस्वस्थ करते आहेच;


परंतु त्यांच्या विचारांची आणि न थांबता काम करत पुढे जाण्याची प्रेरणा या दालनातूनही मिळेल. काहीशा अल्पविरामानंतर त्यांच्याच स्मृतिदिनी १२ जानेवारी, २०२६ रोजी कोल्हापूर येथील राजारामपुरीतील पाचव्या गल्लीत मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दोन मजली भव्य दालनाची इमारत सर्व कोल्हापूरकर वाचकांसाठी खुली होत आहे.

सुनील मेहता यांचं भव्य दालनाचं स्वप्न पूर्ण होत आहे, याचा सर्वांना आनंदच होईल. पुणेकरांबरोबरच, कोल्हापूरकरही मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या साहित्यसंपदेशी वाचक म्हणून नव्याने जोडले जातील, अशी खात्री आहे.

'स्काय इज द लिमिट'प्रमाणे भविष्यकाळात महाराष्ट्रभर उभारण्यात येणाऱ्या भव्य दालनांची बघितलेली स्वप्नं सुनील मेहता यांच्या आशीर्वादाने आणि रसिक वाचकांच्या प्रेमाने नक्कीच पूर्ण होतील..!

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## डेझर्टर

**चार्ल्स ग्लास**

अनुवाद

**अवंती महाजन**

पृष्ठे : ४१२
किंमत : ६००

*दुसऱ्या महायुद्धातून पळून गेलेल्या डेझर्टर्सच्या मनोवेदनांचा घेतलेला वास्तवपूर्ण वेध*

१

अगदी बाल्यावस्थेपासून अमेरिकन मुलांना शिकवले जाते, की कोणालाही ठार मारणे हे चुकीचे–अतिशय चुकीचे असते.

सायकॉलॉजी फॉर द फायटिंग मॅन, प्रिपेअर्ड फॉर द फायटिंग मॅन हिमसेल्फ, कमिटी ऑफ दि नॅशनल रिसर्च कौन्सिल विथ द कोलॅबोरेशन ऑफ सायन्स सर्व्हिस अॅज अ कॉन्ट्रिब्युशन टु द वॉर एफर्ट, दि इन्फन्ट्री जर्नल,

वॉशिंग्टन डी.सी. (अँड पेंग्विन बुक्स, लंडन) १९४३, पा. ३४९

१९१४ ते १९१८च्या दरम्यान झालेल्या महायुद्धाच्या अखेरीस, विल्यम वेस हा एक कनिष्ठ सैनिक फ्रान्समधून निघाला होता. सोबत होता, जर्मनांच्या गोळ्या लागून पार चाळण झालेला पाय, विषारी धूर भरलेली छाती आणि त्रस्त करणाऱ्या अनेक आठवणी. टूर्सजवळच्या कॅथलिक हॉस्पिटलमध्ये विश्रांती घेत असताना, हा ज्युईश-अमेरिकन गोरागोमटा मुलगा, त्याच्या फ्रेंच नर्सच्या प्रेमात पडला. चार महिने हे प्रेमप्रकरण चाललं आणि न्यू यॉर्कला आपल्या घरी जाण्यासाठी म्हणून ७७वी इन्फन्ट्री डिव्हिजन जेव्हा ब्रेस्टजवळ एकत्र आली, तेव्हा हे प्रकरण संपलंसुद्धा. १९१९चा तो एप्रिल महिना होता. युद्धबंदीचा करार होऊन पाच महिने झाले होते आणि आता वेसनी न्यू यॉर्कमध्ये परत जावे असे तिथे काहीही राहिलेले नव्हते. सर्व परिस्थिती आरपार बदलली होती – शहराची आणि माणसांचीही. युद्धोत्तर येणाऱ्या आर्थिक मंदीने आपले रंग दाखवायला सुरुवात केली होती. शस्त्रास्त्रनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांनी कामगारांना कामावरून कमी केले होते. युद्धासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी बँकांचे तगादे सुरू झाले होते. युनायटेड स्टेट्स आर्मीमध्ये प्रवेश घेताना, ७७व्या डिव्हिजनच्या पलटणीतील अनेक सैनिकांच्या नागरी विभागातील नोकऱ्या गेल्याच होत्या. युद्ध संपवून आता परत आल्यावर त्या पुन्हा मिळण्याची शक्यता नव्हती; इतकेच नाही तर घरीसुद्धा त्यांचे मनापासून स्वागत होईल की नाही याची शंकाच होती. अटलांटिकमधून जसजसे हे सैनिक आपल्या देशाकडे येऊ लागले, तेव्हा तर त्यांना 'घरी आपले स्वागत होणारच नाही,' असे वाटायला लागले.

'परंपरागत विजययात्रेला परवानगी मिळणार नाही,' असे वॉर डिपार्टमेंटने जाहीर करताच ७७व्या डिव्हिजनच्या कमांडर्सना धक्काच बसला. कारण जेमतेम महिन्यापूर्वीच, ओ'रायन्स रफनेक्स या २७व्या इन्फन्ट्री डिव्हिजनने, फिफ्थ ॲव्हेन्यूपर्यंत असा एक जल्लोष करणारा मोर्चा काढला होता. २७वी आणि ७७वी डिव्हिजन या दोन डिव्हिजन्स न्यू यॉर्कच्या डिव्हिजन्स होत्या, पण हे एवढेच साम्य त्यांच्यात होते. २७व्या डिव्हिजनमधील सैनिक हे बरेचसे आयरिश, अतिशय श्रद्धाळू असे अमेरिकन ख्रिश्चन्स होते, तर ७७वी डिव्हिजन म्हणजे अठरापगड देशांतील सैनिकांचा भरणा होता – इटली, ग्रीस, रशिया, पोलंड, आर्मेनिया, सीरिया आणि चीन अशा देशांमधून पूर्वी अथवा नुकतेच स्थलांतरित झालेले सैनिक ७७व्या डिव्हिजनचे सभासद होते. त्यांपैकी तीस टक्के सैनिक ज्यू होते. बारा हजार सैनिकांना सैन्यात भरती झाल्यानंतर

अमेरिकेचे नागरिकत्व मिळाले होते. त्यामुळे ते केवळ 'अमेरिकन्स' नव्हते, तर वॉशिंग्टनच्या राजकारणातही होते.

७७व्या डिव्हिजनच्या सैनिकांचे, काहीही झाले तरी स्वागत आणि सन्मान करायचाच, असे न्यू यॉर्कच्या जनतेने ठरविताच, वॉर डिपार्टमेंटने अनेक खऱ्या-खोट्या सबबी पुढे केल्या. प्रथम त्यांनी 'त्या सैनिकांनाच अशी स्वागताची परेड वगैरे नको आहे,' असे सांगून पाहिले; पण त्या सैनिकांनाच प्रत्यक्ष विचारता, ते सगळे एकमताने तयार होते असे लक्षात आले. मग वॉर सेक्रेटरी न्यूटन बेकर यांनी दुकानदारांनी घेतलेली हरकत पुढे केली. फिफ्थ ॲव्हेन्यूच्या ९७ आणि ९८व्या रस्त्यांवर स्वागतासाठी स्टँडस् बांधण्यास या दुकानदारांनी नाही म्हटले होते. परंतु न्यायालयानेच हस्तक्षेप करून त्यांची हरकत फेटाळून लावली आणि बेकर यांचा नाइलाज झाला. अखेर, त्यांनी आपल्या म्यानातले खात्रीचे शस्त्र बाहेर काढले. स्वागताची परेड म्हणजे भयंकर खर्चाची होणार, असे त्यांनी सांगितले. या परेडचा खर्च एक लाख डॉलर्स इतका प्रचंड होईल असे म्हणत, शेवटी हा खर्च ८० हजार डॉलर्सवर आणला आणि अगदी शेवटचे कारण त्यांनी पुढे केले ते म्हणजे, ३० हजार सैनिक एकाच वेळी, बंदरात उतरणार म्हणजे गोदीच्या कामाचा बोजवारा उडणार.

वॉर डिपार्टमेंटच्या या वागणुकीमुळे न्यू यॉर्कची जनता चिडलीच. ७७व्या डिव्हिजनमधील सैनिक मोठ्या शहरांमधून आलेले होते; तर २७व्या डिव्हिजनचे नॅशनल गार्डस्मेन हे स्केनेक्टडी आणि अल्बनीसारख्या दूरच्या प्रांतांतून आलेले होते. वॉर डिपार्टमेंटच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी सर्व मॅनहॅटन शहरभर ठिकठिकाणी सभा भरू लागल्या. युद्धावरून परत येणाऱ्या ज्युईश तरुण सैनिकांचे स्वागत करणाऱ्या वेलकम कमिटीने वॉर सेक्रेटरी बेकर यांना तातडीने एक तार पाठवली. त्यात त्यांनी म्हटले होते, 'अमेरिकेच्या सैन्यभरतीमध्ये पूर्वेकडचा वाटा बराच मोठा आहे. आता त्यांचे सैनिक युद्धावरून परत येत असताना, त्यांचे स्वागत करण्याची संधी नाकारली गेल्यामुळे हे लोक भयंकर चिडले आहेत... आम्ही आपल्याला अगदी निग्रहाची विनंती करतो की स्वागताची परेड होईल या दृष्टीने जे करणे आवश्यक आहे, ते सर्व आपण करावे, हेच देशभक्तीचे लक्षण आहे.' दुसऱ्याच दिवशी कमिटीने अध्यक्ष वुड्रो विल्सन यांना अमेरिकन लष्कराचे कमांडर इन चीफ या नात्याने काढण्यात आलेला, ७७व्या डिव्हिजनच्या परेडवर बंदी घालणारा आदेश रद्द करण्यास कळवले. 'पूर्व अमेरिकेच्या जनतेने, आपल्या देशासाठी फ्रान्समध्ये लढण्याकरिता, आपली मुले आनंदाने देशाला अर्पण केली आहेत. आता ती

मुले लढाईवरून परत येत असताना त्यांचे हार्दिक स्वागत करण्याचा, आणि परदेशात रणांगणावर ज्यांना कायमची चिरविश्रांती मिळाली, त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा पूर्ण हक्क या लोकांना पोहोचतो.'

दोन वर्षांपूर्वी, ज्यांनी सैनिकांना ७७व्या डिव्हिजनमध्ये भरती करून घेतले होते, त्या सिलेक्टिव्ह सर्व्हिस बोर्ड्सच्या अध्यक्षपदी होते, चार्ल्स इव्हान्स ह्युजेस. ह्युजेस हे अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि १९१६मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदाचे रिपब्लिकनांचे उमेदवार होते. '२७व्या डिव्हिजनसाठी आम्ही जे केले, तेच आम्ही ७७व्या डिव्हिजनसाठीही करू,' ह्युजेस यांनी जाहीर केले. 'न्यू यॉर्कमधून असो वा अमेरिकेच्या इतर भागांतून असो, जे सैनिक आघाडीवर गेले, त्यांच्यामध्ये भेदभाव करण्याची इच्छा असणे हे सर्वथा चुकीचे आहे.'

डिव्हिजनने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल कोणाचेच दुमत नव्हते. डिव्हिजनचे दोन हजाराहून अधिक सैनिक धारातीर्थी पडले होते, तर नऊ हजाराहून जास्त जखमी झाले होते. ही संख्या तर २७व्या डिव्हिजनमधील दुखापतींपेक्षा दुप्पट होती. युद्धावर पाठविण्यात येणाऱ्या पहिल्या काही डिव्हिजन्सपैकी ही एक होती, आणि म्यूज- अरगॉन संघर्षाला रोजच्या रोज तोंड देणारी तर एकमेव होती. बरेचसे सैनिक स्थलांतरित असलेल्या या पलटणीबद्दल द न्यू यॉर्क टाइम्स म्हणतो : '१९१८च्या जूनमध्ये लॉरेन्स भागात प्रवेश केल्यापासून ७७वी डिव्हिजन जी सतत लढाई लढत आहे, ती अगदी सेदानमध्ये पोहोचेपर्यंत आणि युद्धबंदीचा करार होईपर्यंत. या डिव्हिजनने जर्मनांना वेस्लीपासून थेट आईस्ने नदीपर्यंत मागे हटवले. अरगॉनच्या जंगलांच्या अगदी मध्यभागापासून या सैन्याने शत्रूची पाळेमुळे पार उखडून टाकली. युद्धामध्ये शौर्य गाजविल्याबद्दल देण्यात येणाऱ्या 'डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस क्रॉसेस' ही पदके मिळविणाऱ्या (एकोणतीस) डिव्हिजन्समध्ये या डिव्हिजनचा ७वा क्रमांक लागतो.' वेस्ली नदीजवळ (या नदीला ही पलटण हेलहोल ऑफ द वेस्ली म्हणत असे.) जर्मनांशी झालेल्या चकमकीत, जनरल एरिक ल्युडेनडॉर्फ याने फॉस्जेन आणि गॅस हवेत सोडला. त्यामुळे हजारो सैनिक हाता-पायातील शक्ती जाऊन अतिशय क्षीण तरी झाले किंवा दृष्टी हरवून आंधळे तरी झाले. विल्यम वेस हा त्यांपैकी एक होता. पट्टी बांधलेले आणि विषारी वायूमुळे झोंबणाऱ्या वेदना होणारे डोळे आणि जर्मनांच्या गोळ्या लागल्यामुळे जवळजवळ तुटलेला पाय अशा अवस्थेत त्याला आघाडीवरून हलविण्यात आले.

वेससारख्या सैनिकाच्या पराक्रमामुळे एकूणच न्यू यॉर्कच्या सैनिकांच्या शौर्याबद्दल अमेरिकेच्या लष्करी निष्ठांना विचार करायला भाग पाडले. अमेरिकन लष्कराच्या अधिकृत माहितीपत्रकात 'मॅन्युअल ऑफ इन्स्ट्रक्शन फॉर मेडिकल ॲडव्हायजरी बोर्ड्स' (१९१७)मध्ये म्हटले होते की, 'परदेशात जन्मलेले – विशेषत: ज्यू-सैनिक हे याच देशात जन्मलेल्या सैनिकांपेक्षा आजारपणाचे ढोंग करण्यात जास्त पटाईत असतात.' होम ऑक्झिलरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विल्यम टी. मॅनिंग यांनी न्यू यॉर्कमधील एका बैठकीत सांगितले होते, की आपल्या मुलांना वंशभेदाचे बळी ठरविले जाते, असे सैनिकांच्या कुटुंबांना वाटते. वुड्रो विल्सन हे खरेतर दक्षिणेकडचे अतिशय सभ्य, सुसंस्कृत गृहस्थ. पण १९१३मध्ये संघराज्याच्या नागरी सेवांच्या व्यवस्थापनामध्ये त्यांनी वर्णभेदाचे धोरण आणले आणि मुख्य म्हणजे, आपल्यावर याबद्दल होणाऱ्या आरोपांबद्दल ते अतिशय निर्विकार होते. त्यांच्या राज्यात १९१५मध्ये दिलेल्या एका भाषणात हे लोकशाहीवादी अध्यक्ष म्हणाले होते, 'युनायटेड स्टेट्सचे काही नागरिक असे आहेत –ज्यांच्याबद्दल बोलायला मला खरोखर लाज वाटते – की जे दुसऱ्या देशात जन्मले आहेत, आणि अमेरिकेच्या स्वाभाविक स्वातंत्र्य आणि संधी देणाऱ्या उदार कायद्यांनी त्यांचे स्वागत केले आहे. पण याच लोकांनी राष्ट्राच्या धमण्यांमध्ये बेईमानीचे विष पसरविले आहे. आमच्या सुशासनाला अपमानास्पद स्थितीला आणून ठेवले आहे. अशा या देशद्रोही, अराजक-बेबंदशाही माजविणाऱ्या भडक प्राण्यांना खरंतर चिरडूनच टाकले पाहिजे.' अर्थातच, हार्लेम हेलफायटर्स या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर्वच काळे सैनिक असलेल्या ३६९व्या रेजिमेंटला किंवा ज्यामध्ये जास्त संख्येने परदेशी जन्मलेले सैनिक भरती होते, अशा ७७व्या इन्फन्ट्री डिव्हिजनला, अमेरिकेच्या अध्यक्षांचे कौतुकाचे चार शब्द कधीच नशिबी आले नाहीत. आणि परिस्थिती अशी होती की सर्वच्या सर्व सैनिक अमेरिकेतच जन्मलेल्या अशा सैनिकांच्या युनिट्सपेक्षा, या दोन डिव्हिजन्सनीच युद्धात सर्वांत जास्त शौर्यपदके मिळवली होती.

जनतेच्या मागणीचा रेटा इतका जबरदस्त वाढला, की वॉर डिपार्टमेंटला त्यापुढे मान तुकवावीच लागली. एप्रिलच्या अखेरीस सैनिकांना घेऊन येणारी जहाजे धक्क्याला लागली आणि ६ मे रोजी, न्यू यॉर्कच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या परेडसाठी सैनिक एकत्र जमले. शाळांना सुट्टी मिळाली, बेकऱ्या, लॉंड्री, कपड्यांच्या दुकानातील कामगार रस्त्यावर आले. सर्व युद्धे संपविणारे युद्ध जिंकणाऱ्या त्यांच्या सिंहाच्या छाव्यांचे त्यांना स्वागत करायचे होते.

डोक्यावर पत्र्याच्या हॅट्स, खांद्यांवर बंदुका घेतलेल्या ७७व्या डिव्हिजनच्या सैनिकांनी वॉशिंग्टन स्क्वेअरपासून फिफ्थ अ‍ॅव्हेन्यूवरून ११०व्या रस्त्यापर्यंत पाच मैलांचे विजयी संचलन केले. त्या वेळी लाखो लोकांनी रस्त्याच्या दुतर्फा त्यांना मानवंदना दिली. खांद्यावर स्टॅच्यू ऑफ लिबर्टीच्या चित्रांचे बिल्ले असल्यामुळे या डिव्हिजनला 'लिबर्टी डिव्हिजन' असे नाव पडले होते. तर कधी कधी त्यांना 'शहरी डिव्हिजन' म्हणण्यात येत असे. नाव काहीही असो, ७७वी डिव्हिजन आता न्यू यॉर्कवासियांची 'आपली' झाली होती. न्यू यॉर्कच्या जनतेने या सैनिकांना 'आपले' मानले होते, 'परेडच्या मार्गावरील प्रत्येक इमारतीची प्रत्येक खिडकी प्रेक्षकांनी खचाखच भरली होती. परेड त्यांच्या समोरून जाताना लोक त्यांच्या दिशेने झेंडे हलवीत होते, जुनी वर्तमानपत्रे, कॅन्डीज, फळे, सिगारेट्सनी त्यांचे अभिनंदन करत होते, असे द न्यू यॉर्क टाइम्स आपल्या वृत्तामध्ये म्हणतो. या वृत्तात पुढे म्हटले आहे, 'बऱ्याचशा दुकानांच्या खिडक्या जखमी माजी सैनिकांनी किंवा त्यांच्या नातेवाइकांनी व्यापल्या होत्या. रस्त्यांवरील बागांमधली बाके सोयीच्या ठिकाणी हलविली होती, ज्यावर रुग्णालयातील विश्रांती घेणारे रुग्ण बसू शकतील आणि विजयी संचलन पाहू शकतील.' सुमारे पाच हजार जखमी सैनिक उघड्या गाड्यांमधून संचलनात सामील झाले होते. या गाड्या स्थानिक, सामाजिक संस्थांनी पुरविल्या होत्या. त्याचबरोबर कुबड्या घेऊन चालणारे सैनिक होते, चाकाच्या खुर्चीमध्ये बसून संचलनात भाग घेणारेही बरेच सैनिक होते. या युद्धात जरी २,३५६ सैनिकांनी फ्रान्सच्या भूमीवर देह ठेवला असला, तरी या संचलनात, युद्धात मृत पावलेले सैनिकही प्रतिकात्मक रीतीने सहभागी झालेले होते.

या मिरवणुकीत दखल घेतली गेली नाही, ती फक्त सैन्यातून पळून गेलेल्या सैनिकांची. अमेरिकेचे सर्व डिव्हिजन्स मिळून सैन्य होते किमान लाखभर, त्यापैकी पळून गेलेल्या सैनिकांची संख्या होती २१,२८२. त्यातील बरेच जण लष्कराच्या मेढीकोटातून किंवा फ्रान्समधील मिलिटरी पोलीस स्टेशनमधून पळाले होते. लष्करातून पळून जाण्याबद्दल चोवीस अमेरिकन सैनिकांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. पण प्रेसिडेंट वुड्रो विल्सन यांनी ही शिक्षा कमी केली. एकूणच या युद्धात सैनिकांचे पळून जाण्याचे प्रमाण बरेच कमी होते. खरेतर अमेरिकेत यापूर्वी जे संघर्ष झाले होते, त्यापेक्षा हे युद्ध जनतेला अजिबात पसंत नव्हते. तरीही या युद्धात सैनिकांच्या गळतीचे प्रमाण बरेच कमी होते. अमेरिकनांपेक्षा ब्रिटिश आणि फ्रेंच सैनिकांचे सैन्यातून पोबारा करण्याचे प्रमाण बरेच जास्त होते, पण त्यांनी चार वर्षे

खंदकात लपून काढल्यामुळे त्यांची स्थिती चांगली राहिली. ब्रिटनने पळून जाणाऱ्या किंवा भेकडपणा करणाऱ्या ३०४ सैनिकांना ठार केले, तर फ्रान्सने याच कारणांसाठी ६०० सैनिकांना गोळ्या घातल्या. त्या उलट ७७व्या डिव्हिजनच्या फारच थोड्या सैनिकांनी शत्रूसमोर तोंड काळे केले. डिव्हिजनला बहुधा आपल्या अशा भित्र्या सैनिकांची लाज वाटत असावी. म्हणून त्यांचा उल्लेख डिव्हिजन 'चकमकीत हरवलेले सैनिक' असा करत असे.

११०व्या रस्त्यावर संचलनाची परेड संपली आणि ७७व्या डिव्हिजनच्या कमांडर मेजर जनरल रॉबर्ट अलेक्झांडरने जाहीर केले, की 'सैनिकांनी आता आपापल्या तलवारी म्यान कराव्यात आणि फ्रान्समध्ये देशासाठी त्यांनी ज्या प्रकारे आपली जबाबदारी पार पाडली, त्याप्रमाणे आता त्यांनी आपल्या नागरी आयुष्याला सुरुवात करावी.'

परंतु फ्रान्समध्ये पराक्रम करूनही रॉबर्ट अलेक्झांडर यांनी म्हटल्याप्रमाणे सर्वांनाच नागरी आयुष्याची नीटपणे सुरुवात करता आली नाही. डिव्हिजनमधील मेडल ऑफ ऑनरसह अनेक पदके मिळालेले लेफ्टनंट कर्नल चार्ल्स व्हिटलसी यांनी १९२१मध्ये आत्महत्या केली. थोड्या विलंबाने झालेला, पण हा युद्धाचाच परिणाम म्हणावा लागेल. बरेच जण जखमी अवस्थेत घरी गेले आणि त्या गंभीर जखमांमुळे त्यांना मृत्यू आला. काही सैनिक अपंगावस्थेत आयुष्य घालवू लागले, तर काहींना उरलेल्या आयुष्यभरासाठी मानसिक आजाराने पछाडल्यामुळे त्या प्रकारच्या रुग्णालयात राहावे लागले. सैनिक म्हणून अधिकृत नोंद असूनही रोजगार न मिळाल्यामुळे काही सैनिक पश्चिमेकडे स्थलांतरित झाले. त्यामध्ये होता, विल्यम वेस हा २७ वर्षांचा तरुण सैनिक. युद्धाच्या आठवणी विसरण्यासाठी आणि पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठी तो पश्चिमेकडे गेला. कान्सासमधील गव्हाच्या शेतात त्याला मदतनीस म्हणून काम मिळाले. तेलाचा वाढता व्यापार पाहून तो ओक्लाहोमा आणि टेक्सासकडे आकर्षित झाला. १९२०च्या सुमारास फेडरल ब्यूरो ऑफ नार्कोटिक्स हा विभाग ट्रेझरी डिपार्टमेंटच्या प्रोहिबिशन युनिटमध्ये समाविष्ट करण्यात आला होता. या विभागात विल्यम वेसने बराच काळ काम केले. मारिजुआना आणि अल्कोहोल हे नवीनच अमली पदार्थ मेक्सिकोमधून अमेरिकेत प्रवेश करत होते. त्यांच्यावर लक्ष ठेवून त्यांना प्रतिबंध करणे हे वेसचे काम होते, परंतु अल पासोमध्ये अशी एक घटना घडली, की वेसला राजीनामा द्यावा लागला. वेसच्या आयुष्यातील एक पर्व संपले – जे त्याने त्याच्या कुटुंबालाही कधी सांगितले नव्हते.

राजीनामा देऊन वेस न्यू यॉर्कला परतला. इथेच स्थायिक होण्याच्या दृष्टीने त्याने १९२३मध्ये जीन सीडमन या स्त्रीशी विवाह केला. दिनांक ३ ऑक्टोबर १९२५ रोजी या दाम्पत्याला एक मुलगा झाला. त्याचे नाव त्यांनी ठेवले स्टीफन जेम्स, लाडाने त्याला सगळेजण स्टीव्ह म्हणत, पण त्याची आई मात्र त्याला 'लकी जिम' असेच म्हणायची. स्टीव्ह पाच वर्षांचा झाल्यावर त्याला बहीण मिळाली. विल्यम आणि जीनने तिचे नाव ठेवले होते हेलन रूथ.

ब्रुकलिनमध्ये प्रॉस्पेक्ट पार्कसमोर २७५ ओशन ॲव्हेन्यू इथे हे वेस कुटुंब राहत होते. लाल विटांच्या या घरात स्टीव्ह आणि हेलन मोठे होत होते. ''आमच्या शेजारचे कुटुंब मोठे होते, पण एकदम शांत होते ते लोक...'' स्टीव्ह बऱ्याच वर्षांनंतर मागच्या आठवणी सांगताना म्हणतो, ''...एकूणच आमच्या जवळपासची लोकं मनापासून कामधंदा करणारी आणि मध्यमवर्गीय, सुसंस्कृत अशी होती. आमच्या वेस कुटुंबाप्रमाणेच इथले बरेच जण मॅनहॅटनच्या पूर्वेकडच्या वस्तीतून या भागात राहायला आलेले होते. विल्यम वेस स्वभावाने थोडासा माणूसघाणाच होता. प्रत्येक वर्षी युद्धसमाप्ती कराराच्या दिवशी तो सुमारे तासभर स्वत:ला खोलीत कोंडून घ्यायचा आणि कुटुंबापासून वेगळा असा एकटाच बसायचा – शांतपणे. 'माझे वडील कसे होते, हे काही मला नक्की सांगता येणार नाही–' स्टीव्ह वेस म्हणतो. विल्यम वेसच्या नोकऱ्याही विचित्र प्रकारच्याच असायच्या. बरेचदा तो सुरक्षारक्षक म्हणून काम करायचा. कोणत्याही बाबतीत त्याच्यावर विश्वास ठेवावा असा त्याचा स्वभाव नव्हता, त्यामुळे विल्यम आणि स्टीव्ह – पिता-पुत्रात नेहमीच तणाव असायचा. 'माझ्या वडिलांनी विजेची बिलं कधीच वेळेवर भरली नाहीत.' स्टीव्हला आठवतं. 'मिळालेले सगळे पैसे ते जुगारात उधळायचे.' तरीही स्टीव्हकडे वडिलांच्या काही सुंदर आठवणीही होत्या. 'ते अगदी विनोदी स्वभावाचे होते. गोष्टी खूप छान सांगायचे. खरं तर ते वयाने वाढले, तरी 'मोठे' कधी झालेच नाहीत.' स्टीव्ह सांगतो. मंदीची लाट आली, त्या वेळी विल्यमने आपल्या सैनिकी सहकाऱ्यांना, आपण लष्करात बजावलेल्या सेवेबद्दलचे पेन्शन आणि इतर लाभ सरकारकडून कसे पदरात पाडून घ्यायचे, याबद्दल सांगितले. यामध्ये त्याच्याही हाती बऱ्यापैकी मोठी रक्कम पडली. या पैशांतून या कुटुंबाने त्यांची पहिलीवहिली सुट्टी पाऊकिप्सी येथे जाऊन साजरी केली.

जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केला. त्यानंतर सहा महिन्यांनी, म्हणजे जून

१९४२मध्ये अमेरिका युद्धात उतरली. याच सुमाराला स्टीव्हने ब्रुकलिनच्या लाफाएत हायस्कूलमधून पदवी घेतली. स्टीव्ह त्या वेळी सोळा वर्षांचा होता. त्याच्या वर्गातल्या सगळ्या मुलांपेक्षा त्याचे वय दोन वर्षांनी कमीच होते; तरीही त्याची उंची सगळ्यांपेक्षा जास्त होती. पाच फूट अकरा इंच उंचीच्या स्टीव्हचे वजन १६० पौन्ड्स होते. एकूणच पिंगट रंगाच्या कुरळ्या केसांचा स्टीव्ह त्याच्या वर्गात सगळ्यात निरोगी, धट्टाकट्टा होता. हायस्कूलचे शिक्षण पूर्ण झाले तरी स्टीव्हने शिक्षण सोडले नाही. महाविद्यालयीन पातळीवरचे मानसशास्त्र, रोगनिदानशास्त्र (पॅथॉलॉजी) आणि रसायनशास्त्र या विषयांतील अभ्यासक्रम घेऊन, त्याने रात्रीच्या वर्गात आपले शिक्षण सुरू ठेवले. मॅनहॅटनमध्ये ५७व्या रस्त्यावर २२१ वेस्ट येथे सरकारचे 'ऑफिस ऑफ वॉर इन्फर्मेशन' (OWI) होते. तेथे स्टीव्हला फोटोलिथोग्राफर म्हणून नोकरी मिळाली. दिवसा नाकरी आणि रात्री शिक्षण असा त्याचा दिनक्रम सुरू झाला. ऑफिसमध्ये त्याला छायाचित्रांच्या प्लेट्स तयार करण्याचे काम मिळाले. वॉर इन्फर्मेशन ऑफिसच्या प्रचारपुस्तिकांमध्ये आणि पोस्टर्सवर ही छायाचित्रे वापरण्यात येत असत. इथे काम करत असतानाही स्टीव्हचे स्वप्न मात्र वेगळेच होते. लष्कराच्या सायकॉलॉजिकल वॉरफेअर ब्रांचमध्ये, परदेशात जाऊन काम करण्याचे स्टीव्हच्या मनात होते. देशातील वॉर इन्फर्मेशन ऑफिसचेच उद्दिष्ट याही विभागाचे होते – सहयोगी राष्ट्रांना जनतेचा पाठिंबा मिळवणे.

सायकॉलॉजिकल वॉरफेअरमध्ये भाग घेण्याचा एकच मार्ग होता – तो म्हणजे युनायटेड स्टेट्सच्या लष्करामध्ये भरती होणे. स्टीव्ह त्या वेळी केवळ १७ वर्षांचा होता. त्यामुळे त्याला लष्करात प्रवेशासाठी वडिलांच्या परवानगीची गरज होती. लष्करात प्रवेश घेण्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे स्टीव्हने घरी आणली; पण विल्यम वेसने त्यावर परवानगीची स्वाक्षरी करायला नकार दिला. आश्चर्य आणि दु:खभरल्या नजरेने स्टीव्हकडे पाहत विल्यम वेस म्हणाले, ''खरंखुरं युद्ध म्हणजे सिनेमातल्या युद्धासारखं नसतं बाळा!'' सायकॉलॉजिकल वॉरफेअरमध्ये काम करण्याचं स्टीव्हचं स्वप्न धूसर होतंय की काय असं त्याला वाटू लागलं. येत्या ऑक्टोबरमध्ये तो अठरा वर्षांचा झाला असता. मग त्याला वडिलांच्या परवानगीची गरज उरली नसती. परंतु तोपर्यंत स्टीव्हने वाट पाहिली असती तर सिलेक्टिव्ह सर्व्हिस बोर्डाने त्याला सक्तीने लष्करात भरती केली असते आणि अशाप्रकारे भरती झालेल्या आणि ज्यांच्याकडे महाविद्यालयाची


पदवी नाही, अशा सैनिकांना इन्फन्ट्रीमध्ये रायफलमेन म्हणून काम करावे लागले असते – असे काम जे लष्करामधील सर्वांत कष्टप्रद आणि धोकादायक होते.

स्टीव्हने वडिलांना समजावून पाहिले, वादही घालून पाहिला; पण वडील निर्विकार! ''बाळा, काल घडल्यासारखी वाटते ही गोष्ट–'' विल्यमनी प्रथमच स्टीव्हशी संवाद केला. त्याला समजावताना विल्यम पुढे म्हणाले, ''...पण आहे १९१८च्या वसंतऋतूतली. युद्धात मी जखमी झालो होतो. विषारी वायू माझ्या अंगात भिनला होता. फिसमेसजवळच्या भागात होतो मी. त्या वेळच्या आठवणी अजूनही माझ्या डोक्यात घणघणते घाव घालतात. त्यानंतरचं माझं बरंचसं आयुष्य त्यातून बाहेर पडण्यातच खर्ची पडलं. टूर्सच्या जवळ असलेल्या एका फ्रेंच हॉस्पिटलमध्ये मी खितपत पडलो होतो – चार महिने. त्यानंतर पश्चिमेकडची किमान दोन वर्षं मला बरं व्हायला लागली.'' विल्यम वेस यांनी त्यानंतर, टेक्सास सोडल्यापासून मनाच्या खोल कप्प्यात दडवून ठेवलेल्या रहस्याचा उलगडा केला, 'अल पासोमध्ये एक दिवस अचानक फेडरल नार्कोटिक्सचा एजंट म्हणून काम करणाऱ्या एका माणसाची माझ्या हातून भररस्त्यात हत्या झाली. माझ्याही नकळत मी त्याच्यावर बंदूक चालवली. हे तुम्हाला कोणाला माहीत आहे का? पण त्या दिवसापासून काही महत्त्वाकांक्षा किंवा अगदी काही छोटंसं काम करायचीही शक्ती माझ्यात उरली नाही. काही करायला जायची मला भीतीच वाटते.'' सतरा वर्षांच्या स्टीव्हची हे सगळं ऐकून बोबडीच वळली. ''डॅड,मी...'' तो कसाबसा पुटपुटला.

''...तेव्हा बाळा, ते झेंडे– ते बँडस– त्या परेड्स सगळं विसरून जा.'' विल्यम म्हणाले. ''हे फक्त भुरळ घालणारं आहे. कागदोपत्री सैनिकांची संख्या वाढवण्याचं तंत्र आहे हे! खरंतर, युद्ध म्हणजे माणसांचे जीव घेणं, अतीव वेदना देणं आणि माणसाला केवळ मोडून टाकणं असतं!''

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## क्रांतीच्या वाटेवर

**भा. द. खेर**

पृष्ठे : १३६
किंमत : १९०

*क्रांती की प्रीती, या द्वंद्वात सापडलेल्या तरुणाची संघर्षमय कहाणी*

त्या हाकेनं रमेश जागा झाला खरा; परंतु आपण कशानं जागे झालो हे प्रथम त्याला समजेना. त्या वेळी बाहेर पर्जन्यवृष्टीचं नुसतं थैमान चाललं होतं; आणि एखाद्या निष्णात धनुर्धाऱ्यानं आपल्या भात्यातून अचूक बाण सोडावेत त्याप्रमाणे ते जलरूपी बाण आकाशातून रमेशच्या घराच्या पत्र्यावर पडत होते. आपण त्याच आवाजानं जागे झालो, असं त्याला वाटू

लागताच त्याच्या नावानं हाक मारलेली त्याला ऐकू आली. तो चट्कन आपल्या गादीवरून उठला आणि त्यानं दाराची कडी काढली. इतक्यात मेघांचा गडगडाट होऊन त्यामधून विद्युल्लतेचं प्रखर तेज बाहेर पडलं आणि त्यातच रमेशला शिवा पोलिसाचा चेहरा स्पष्ट दिसला.

एवढ्या पहाटे तो का आला असावा, याचा काहीच अंदाज न लागून रमेश त्याला काही विचारणार; इतक्यात शिवा पोलीसच घाबऱ्या स्वरानं रमेशला म्हणाला, ''बाबूजी, आपण फार मोठ्या संकटात आहात. लवकरच आम्ही आमची पोलीस पार्टी घेऊन तुम्हाला पकडण्यासाठी येथे येत आहोत. आम्हाला येथे पोचायला पंधरा मिनिटं, - फार-फार तर वीस-पंचवीस मिनिटं लागतील. आपण आपला वेष बदला आणि इथून पळून जा–''

शिवा पोलिसाच्या या घाबऱ्या बोलण्यावर रमेशनं थोडंसं हास्य केलं आणि प्रश्नार्थक मुद्रेनं त्याच्याकडे बघितलं, तेव्हा शिवा काकुळतीच्या स्वरात त्याला म्हणाला, ''प्रत्येक गोष्ट अशी हसण्यावारी नेण्याची तुमची नेहमीची खोड मला ठाऊक आहे; पण आता मात्र असं करू नका. पोलीस तुम्हाला पकडायला येत आहेत. तुम्ही क्षणाचाही विलंब न करता इथून पळून जा. अगदी फार तर आणखी दहा-पंधरा मिनिटं मी पोलिसांना रोखून धरू शकेन. जा– दूर दूर निघून जा– मला आता गेलं पाहिजे–''

असं म्हणून तो जाऊ लागला तेव्हा रमेशनं त्याला परत बोलावलं आणि विचारलं, ''शिवा, तुझ्या कारभारणीचं कसं आहे रे?''

हा प्रश्न ऐकताच शिवाचा कंठ दाटून आला आणि त्याच आवाजात त्यानं म्हटलं, ''आजच आठ दिवस झाले, कारभारीण मला सोडून गेली'''

आणि थोडा वेळ थांबून जणू काय आपण एखाद्या कर्तव्याला मुकत आहोत अशा जाणिवेनं तो म्हणाला, ''पण बाबूजी, मी तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाही. माझ्या कारभारणीच्या आजारीपणात तुम्ही मला पैशाची मदत केलीत. ते तुमचे उपकार मला जन्मोजन्मी फेडता येणार नाहीत. माझंच नशीब फुटकं म्हणून ती गेली. बरं, तुम्ही आता मार्गाला लागा. मला तुमच्या अटकेची बातमी अर्ध्या तासापूर्वी कळली. लगेच

तीरासारखा मी येथे धावत आलो. तुम्ही आमच्या तावडीतून सुटलात म्हणजे तुमच्यापेक्षाही मला आनंद होईल. बाबूजी, इथून आता पंधरा मिनिटांतच पाय काढा आणि या गरिबावर एवढे उपकार करा.''

जेव्हा पुन्हा विद्युल्लतेचा झगझगाट झाला तेव्हा शिवा पोलिसाची ओलीचिंब मूर्ती धांदलीनं रस्ता तोडताना रमेशला दिसली. त्या वेळी तो आपल्या मनाशी आश्चर्य करू लागला की आपल्या अटकेची ही भानगड मधूनच काय म्हणून उपस्थित झाली?

कारण आपल्याला आता अटक होणार नाही याबद्दल त्याचं मन हळूहळू निर्धास्त व्हायला लागलेलं होतं. आपल्याला अटक झालीच असती, तर ती ९ ऑगस्टच्या सुमारासच व्हायला हवी होती. ८ ऑगस्टला 'चले जाव'चा ठराव झाल्यानंतर त्याच सुमारास देशातील बहुतेक लहान-मोठ्या काँग्रेस पुढाऱ्यांना अटक झालेली होती. पुढे अटकेचं सत्र कमी व्हायला लागलं होतं आणि गुप्त अत्याचारांचं सत्र वाढीला लागलं होतं. ज्यांचा ज्यांचा म्हणून काँग्रेस या संस्थेशी नावापुरता तरी संबंध होता त्या त्या सर्वांना ब्रिटिश सरकारनं तुरुंगात डांबलेलं होतं. तेव्हा, आपल्याला जर अटक व्हायची होती तर ती त्याच सुमारास व्हायला हवी होती आणि त्या वेळी जर ती झाली नव्हती तर ती आता होण्याचं काहीच कारण नाही अशी रमेशची खात्री होती.

त्यामुळे सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या तारखेस भल्या पहाटे आपल्याला अटक होणार ही बातमी शिवा पोलिसानं त्याला सांगितली तरी त्यावर त्याचा विश्वास बसणं शक्य नव्हतं. वास्तविक ती बातमी त्याला आदल्याच दिवशी कळली होती आणि त्यानं ती थट्टेवारी नेली होती.

त्या दिवशी संध्याकाळी हिंदी विद्यालयाचा तास संपवून आपल्या खोलीवर यायला रमेशला बरीच संध्याकाळ झाली होती. खोलीवर आल्यानंतर बऱ्याच वेळानं त्याला मामा खानावळवाल्याचा असा निरोप आला की आज त्याचा डबा नेहमीप्रमाणे खोलीवर येणार नाही. त्यानं आज खानावळीत जेवायला यावं. मामा खानावळवाला ही एक मोठी गप्पिष्ट स्वारी होती आणि जेव्हा त्याला गप्पा मारायची लहर येई तेव्हा तो

रमेशला असाच निरोप पाठवत असे. त्याप्रमाणेच हा निरोप आला असेल असं वाटून त्यानं मामांना उलट निरोप धाडला की जेवायला यायला त्याची काहीच हरकत नाही; मात्र त्याला रात्री यायला जरा उशीर होईल.

तो जेव्हा मामांच्या खानावळीत जाऊन पोचला तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते. त्याला बघताच मामांनी म्हटलं, ''या! सगळ्यांची जेवणं उरकली. मी आता तुमचीच वाट बघत होतो.''

यावर रमेशनं हसून विचारलं, ''का? आज गप्पांचं बरंच 'बंडल' सोडायचं दिसतंय!''

रमेशच्या या बोलण्यावर मामांनी आपल्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे विनोदानं उत्तर दिलं. एरवी त्याला पाहिल्यानंतर ते विनोदानं म्हणत असत, ''बाबूजी, तुम्ही अजून तुरुंगाच्या बाहेर कसे, याबद्दल मला मोठं नवल वाटतं. वास्तविक, तुमचे हे खादीचे पांढरे शुभ्र कपडे तुरुंगात वाळत असायचे; आणि मामाच्या खानावळीऐवजी या वेळी तुम्ही येरवड्याची दाल-रोटी खात बसलेले असायचे! किंवा त्या 'भाई' लोकांच्याप्रमाणे तुम्ही मालगाड्या उलटवण्याच्या मोहिमेत तरी गुंतून गेलेले सापडायचे! 'पळायचं' सोडून तुम्ही अजून स्थिर कसे?''

यावर त्याच थट्टेच्या स्वरात रमेश उत्तर देत असे, ''मामा, मी अवश्य पळून जाईन; परंतु एखादा घातपात करून आल्यानंतर, ऐन मध्यरात्री अन्नाच्या आशेनं जर मी तुमच्या खानावळीचं दार ठोठावलं तर तुम्ही मला आत घ्याल का?''

रमेशचं बोलणं ऐकून मामांचा थट्टेचा स्वर कोठल्या कोठे लुप्त होऊन जाई आणि नंतर ते आवेशानं बोलूं लागत. त्याच्या वरील बोलण्यावर एकदा ते त्याला म्हणाले होते, ''अलबत! तुम्ही रात्री अपरात्री माझ्याकडे येऊन तर बघा. म्हणजे तुम्हाला मी आश्रय देतो किंवा नाही हे दिसून येईल.''

आणि आजूबाजूला कोणी नाही अशी खात्री करून घेतल्यानंतर ते पुढे म्हणाले होते, ''रमेशबाबू, आता तुम्हाला सांगायला काहीच हरकत नाही. त्या गोष्टीला आता ४५ वर्षं होऊन गेली. पुण्यात १८९७

साली गणेशखिंडीच्या रस्त्यावर रात्री रॅन्ड आणि आयर्स्ट या दोन इंग्रज अधिकाऱ्यांचा चाफेकर बंधूंनी खून केला. त्या दोघा बंधूंना कोणी आश्रय दिला? सांगा ना? या पठ्ठ्यानं! खून केल्यानंतर ते दोघे थेट माझ्याकडे आले. त्या वेळी पुण्याच्या नारायण पेठेत माझी खानावळ होती. माझ्याकडे आल्यानंतर, खून करून आपण आलो आहोत असं बेधडकपणानं मला त्यांनी सांगितलं. आणि मीही तितक्याच निधड्या छातीनं त्यांना म्हटलं, की शाब्बास बेट्यांनो! निर्धास्तपणानं माझ्याजवळ खाऊनपिऊन राहा. काय बिशाद आहे पोलिसांची माझ्या इथे येऊन तपास करायची?''

एवढं बोलल्यानंतर गतकालातील आपल्या शूरत्वाच्या स्मृतीमध्ये मामा काही वेळ गढून गेले होते. रमेशनं जेव्हां त्या वेळी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं बघितलं तेव्हा मामांनी पुढे म्हटलं होतं, ''परंतु त्या दोघा बंधूंना माझ्या घरी कायमचं ठेवून घेण्याचा योग मला आला नाही. त्याच सुमारास द्रविड बंधूंनी चाफेकर बंधूंचा घात केला आणि त्याच वेळी बळवंतराव टिळकांनी मला गायकवाड वाड्यात बोलावून घेऊन सांगितलं की, मामा, आता आपलं चंबूगबाळं उचलून तुम्ही पुण्यातून आपला पाय काढा. नाहीतर तुमच्यावर निष्कारण रोष होईल. मी बळवंतरावांचं म्हणणं मान्य केलं होतं; परंतु मोठ्या धिटाईनं त्यांना म्हणालो होतो, 'मी तुमच्या आज्ञेप्रमाणे पुण्यातून जातोय. ठाण्याला जाऊन हाच धंदा करावा असं माझ्या मनात आहे. म्हणजे पुणंही नको आणि मुंबईही नको; परंतु पुण्याच्या आणि मुंबईच्या मध्यभागी असल्यामुळे आम्हाला तुमच्या साऱ्या हालचाली कळू शकतील; मात्र माझी एक अट आहे.' या माझ्या बोलण्यावर बळवंतरावांच्या श्यामल विशाल भालप्रदेशावर काही आठ्या दिसू लागल्या. ती त्यांची प्रश्न विचारण्याची नेहमीची तऱ्हा मला माहीत असल्यामुळे मी म्हटलं, 'माझी अट अशी आहे की, तुम्ही मुंबईहून पुण्याला किंवा पुण्याहून मुंबईला जाताना माझ्या खानावळीत एकदा जेवून गेलं पाहिजे.' या माझ्या बोलण्यावर त्यांनी सुपारीची बारीक भुकटी आपल्या तोंडात टाकली, मनसोक्त हसून घेतलं आणि म्हटलं, 'हात्तेच्या! हीच ना तुझी अट, मामा? अरे, एकदम मला मान्य आहे ती! मुंबईला

जसा सरदारगृहात उतरतो तसा ठाण्याला तुझ्या खानावळीत उतरेन मी. मग तर झालं? पण आता चालता हो पाहू पुण्यातून!'

आपलं हे बोलणं संपल्यानंतर दाराची दिशा दर्शवण्यासाठी उचललेला त्यांचा उजवा हात माझ्या डोळ्यासमोर अजून दिसतो पाहा! तेव्हापासून आम्ही या ठाण्यात जरा आडबाजूला येऊन पडलो खरे! परंतु आमचे हे राजकीय 'धंदे' बंद झाले म्हणता काय? बिलकूल नाही. जॅक्सनचा खून केलेला तुमचा तो अनंता कान्हेरे... खून करण्यासाठी नाशिकला जाण्यापूर्वी या मामाचं अन्न खाऊन गेला होता. अहो, अशी एक की दोन उदाहरणं! या मामाचं रक्तच मुळी क्रांतिकारक आहे. तेव्हा बाबूजी तुम्हाला सांगायचं एवढंच की रात्री अपरात्री या मामाचं दार तुम्ही खुशाल ठोठवा! एकदा त्याला कळलं की हे सारं देशासाठी चाललेलं आहे, म्हणजे मामानं त्याला आपला हातभार लावलाच म्हणून समजा!''

याप्रमाणे काही थट्टेचं, तर काही गंभीर स्वरूपाचं मामांचं असलं बोलणं रमेशला नेहमी ऐकावं लागे. क्वचित प्रसंगी मामांच्या बोलण्यात अतिशयोक्ती असली, तरी सर्वसाधारण मामांची खानावळ म्हणजे गावातील बातम्यांचं एक ठाणं समजलं जाई; परंतु त्या दिवशी रात्री मात्र रमेशला बघताच मामांनी म्हटलं, की मी आता तुमचीच वाट बघत होतो,' या त्यांच्या बोलण्याला काही निराळाच अर्थ होता. त्यांच्या बोलण्यात थट्टेची लहर दिसली नाही. किंबहुना, काहीतरी महत्त्वाची बातमी त्यांना रमेशला सांगायची होती, असं त्यांच्या चर्येवरून स्पष्ट दिसत होतं.

रमेशला बघताच त्यांनी आपल्या कन्येला बाहेर हाक मारली आणि म्हटलं, ''मंगले, रमेशबाबू आले आहेत. साऱ्यांची पानं तयार कर.''

पानावर बसल्यानंतर जेव्हा मामा बराच वेळ बोलले नाहीत तेव्हा रमेशला आश्चर्य वाटू लागलं. पहिला भात संपल्यानंतर मंगलेला ते फक्त एवढंच म्हणाले, ''अगं, रमेशबाबूंना एखादा पापड भाजून दे. त्यांना आपले पापड फार आवडतात.'' आणि नंतर रमेशकडे तोंड करून गंभीरपणानं त्यांनी म्हटलं, ''रमेशबाबू, मी एखादी वाईट बातमी तुम्हाला सांगितली तर तुम्ही घाबरणार नाही ना?''

रमेशनं नकारार्थी मान हलवताच ते म्हणाले, ''तुम्हाला उद्या कदाचित अटक होण्याचा संभव आहे. तेव्हा...''

पुढे त्यांना काय बोलावं हे सुचेना. तेव्हा रमेश मनापासून हसला आणि म्हणाला, ''मामा, यामध्ये घाबरण्यासारखं काय आहे? उद्याच कशाला? आता जरी मला अटक केली तरी माझी तयारी आहे; परंतु मला मात्र वाटत नाही की इतक्या उशिरा मला अटक करण्याचं काही कारण निघालं असेल.''

''अटकेचं कारणही मला कळलेलं आहे; परंतु ते तुम्हाला सांगण्यात काहीच अर्थ नाही. तुम्ही या अटकेला कदाचित भित नसाल, हे तुमच्या या हसण्यावरून मला स्पष्ट दिसत आहे; परंतु मला जर विचारलं तर मी या वेळी तुम्हाला असाच सल्ला देईन की तुम्ही आता फरार व्हा! या चळवळीत फरार होणंच शहाणपणाचं ठरणार आहे.''

यावर नेहमीच्याच तऱ्हेनं रमेशनं मामांना गप्प केलं. त्यानं ती गोष्ट थट्टेवारी नेली;

परंतु जेवण उरकल्यानंतर तो जेव्हा हात धुवायला मोरीवर गेला तेव्हा त्याला एकांतात गाठून मंगला हलक्या स्वरात म्हणाली, ''तुम्ही खरंच आता फरार व्हा! सरकारच्या तुरुंगात कुजत पडण्यापेक्षा सरकारशी अशा तऱ्हेनं दोन हात खेळण्यातच खरा पुरुषार्थ आहे. तेव्हा...''

तिचं बोलणं पुरं होण्यापूर्वी आपल्या हाताला साबण चोळीत असताना रमेशनं म्हटलं, ''मी पळून गेलो आणि लपूनछपून वावरत असताना समज येथे आलो, तर मला तुझ्या घरात आश्रय देशील?''

त्याची ही अट किती सोपी आहे व ती आपल्याला एकदम मान्य आहे अशी समजूत होऊन ती अधीरतेनं म्हणाली, ''तुमच्यासारख्यांना आश्रय देण्यात मला केवढा अभिमान वाटेल? मी मामांची मुलगी आहे बरं का!''

इतक्यात मामा तेथे आले आणि तिचं बोलणं ऐकून तिला म्हणाले, ''काय गं? तू माझी मुलगी आहेस याबद्दल त्यांना शंका आहे की काय? म्हणून अगदी ठासून सांगतेस की मी मामांची मुलगी आहे बरं का!''

''इश्शऽऽ! असं हो काय मामाऽ'' असं म्हणून मंगला त्या ठिकाणाहून

लाजून पळून गेली खरी! परंतु घरी जाण्यापूर्वी एकांतात गाठून तिनं म्हटलं, ''रमेश, निदान मी सांगते म्हणून तरी आता तुम्ही फरार व्हा! माझं एवढं ऐकायचं नाही का?''

एका खानावळवाल्याच्या मुलीनं आपल्यावर एवढा हक्क गाजवावा याबद्दल रमेशला मनातून तिचा थोडासा राग आला; परंतु मंगला खानावळवाल्याची मुलगी होती हा काही तिचा दोष नव्हता. ती त्याची हिंदी विद्यालयातील आवडती विद्यार्थिनी होती आणि ती अत्यंत सुंदर होती याबद्दल कुणाचंही दुमत होण्यासारखं नव्हतं.


घरी जाताना मात्र मंगलेबद्दलचा राग रमेशच्या मनात उरला नव्हता आणि आपल्या अटकेच्या बातमीचंही स्मरण त्याला राहिलं नव्हतं.

त्या अंधाऱ्या रात्री आपल्या सरावाच्या रस्त्यावरून मंद मंद पावलं टाकत चालत असताना त्याचे निराळेच विचार चालले होते. मोठमोठ्या मुलामुलींना ज्याप्रमाणे तो हिंदी शिकवत होता त्याप्रमाणे अगदी लहान मुलांचंही एक विद्यालय तो आपल्या जागेत चालवत होता. जगातील कपटमार्गांची ओळख झालेल्या मोठ्या मुला-मुलींना धडे देण्यापेक्षा निष्कपटी बालकांच्या सहवासात त्याचं अंत:करण हर्षानं काठोकाठ भरून येत असे. लहान मुलांच्या विद्यालयासाठी त्याला काही खेळणी खरेदी करावयाची होती आणि एक अद्ययावत वाचनालय प्रस्थापित करावयाचं होतं.

आणि त्या रात्री त्या निर्जन मार्गावरून चालताना रमेशचे त्याबद्दलच विचार चालले होते. तो खोलीवर आला तरी त्याचे ते विचार थांबले नव्हते. बरीच रात्र झाल्यानंतर जेव्हा त्यानं गादीवर आपलं अंग टेकलं तेव्हासुद्धा त्याला त्या विचारांनी सोडलं नव्हतं. त्याच्या अटकेची बातमी तो पार विसरून गेला होता आणि मंगलेचं बोलणं आपल्या स्मृतीला ताण देऊनदेखील त्याला आठवत नव्हतं.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# व्हिक्टरी सिटी

**सलमान रुश्दी**

अनुवाद

**वंदना भागवत**

पृष्ठे : ३४८

किंमत : ५२०

*जादुई बियाणातून निर्माण झालेलं विजयनगरचं साम्राज्य आणि त्याच्या निर्मातीचा विलक्षण जीवनप्रवास मांडणाऱ्या महाकाव्याचं सलमान रुश्दींनी साकारलेलं अनोखं गद्य रूप*

### जन्म

आयुष्याच्या अखेरच्या दिवशी, दोनशे सत्तेचाळीस वर्षांच्या पंपा कंपानाने, बिसनागवरचे तिचे महाकाव्य पूर्ण केले आणि एका मृत्तिकापात्रात ठेवून मेणाच्या लेपाने पात्राचे तोंड बंद केले. राजवाड्याच्या उद्ध्वस्त आवारात

तिने ते पात्र पुरले. पुढच्या पिढ्यांना त्यातून काही संदेश मिळावा, अशी तिची इच्छा होती. पंपा कंपाना कोणी साधीसुधी बाई नव्हती. ती अंध कवयित्री होती, चमत्कार घडवून आणणारी द्रष्टी होती. साडेचारशे वर्षांनंतर आम्हाला ते मृत्तिकापात्र सापडलं आणि 'जयपराजय' नावाचे ते सर्वोत्कृष्ट महाकाव्य आम्ही प्रथमच वाचले. विजय आणि पराभव. ते संस्कृत भाषेत लिहिले होते. रामायणाची जेवढी लांबी आहे, तेवढीच याचीही म्हणजे चोवीस हजार श्लोक. त्यातून तिने जे साम्राज्य साधारण एक लक्ष साठ हजार दिवस इतिहासापासून लपवून ठेवले होते, त्याची रहस्ये आम्हाला समजली. आम्हाला फक्त शिल्लक राहिलेले भग्नावशेष माहीत होते, शिवाय त्या भग्नावशेषांचा आमच्या स्मरणातील इतिहासदेखील उद्ध्वस्त स्वरूपातलाच होता; कारण काळ जात राहतो, काळासोबत स्मरणदेखील बिनसत जाते, नंतर त्यात असत्यांची भर पडत जाते. जेव्हा आम्ही पंपा कंपानाचा तो ग्रंथ वाचला, तेव्हा भूतकाळ नव्याने हाती आला. बिसनाग साम्राज्य प्रत्यक्षात जसे होते, तशा स्वरूपात परत एकदा जन्माला आले. त्यातल्या स्त्री-योद्ध्या, त्याचे सुवर्ण पर्वत, त्याची उदारमनस्कता आणि त्याची अधूनमधून उफाळलेली क्षुद्रमनस्कतादेखील, त्याची शक्तिस्थळे आणि कमकुवतपणा सारेच जिवंत झाले. आम्ही पहिल्यांदाच त्या साम्राज्याचा संपूर्ण इतिहास ऐकला. त्याची सुरुवात आणि शेवट दहनाने आणि शिरच्छेदाने झाली. ती ही कथा. सध्याचा जो लेखक आहे, त्याने साध्या भाषेत सांगितलेली. तो काही विद्वान पंडित नाही किंवा कवीही नाही; केवळ हाती आलेले धागेदोरे गुंफून कथावस्त्र विणू पाहणारा विणकर आहे. तो त्याला समजलेली कथा सांगतो आहे. तो त्याचा पाठ असेल. पाठभेद असतात. हा लेखक ही कथा सांगतो आहे, ती साध्या मनोरंजनासाठी आणि आजच्या वाचकांचे नैतिक उन्नयन होण्याची शक्यता असेल, तर त्यासाठी. कोणता एक विशिष्ट वाचकवर्ग त्याच्या डोळ्यांसमोर नाही. सर्वच प्रकारच्या वाचकांनी ही कथा वाचावी, असे त्याला वाटते. म्हातारे आणि तरुण, सुशिक्षित आणि कमी शिकलेले, शहाणपणाच्या शोधात असलेले आणि ज्यांना माणसाची स्खलनशीलता मनोरंजक वाटते असे, उत्तरनिवासी तसेच दक्षिणनिवासी, विविध देवादिकांचे अनुयायी किंवा देव नसलेल्यांचे अनुयायी, उदारमनस्क आणि क्षुद्र वृत्तीचे, पुरुष आणि स्त्रिया आणि अधल्यामधल्या अथवा त्यापलीकडच्या लैंगिक ओळखी असणारे, खानदानी वंशज किंवा तद्दन सामान्य, भले लोक आणि गुंड, भोंदू भंपक आणि परदेशी, विनयशील शहाणी माणसे आणि उद्दाम मूर्ख अशा सगळ्यांनीच.

बिसनागची कथा इ.स.च्या चौदाव्या शतकात, सध्या आपण ज्याला

इंडिया, भारत, हिंदुस्थान म्हणतो त्याच्या दक्षिणेकडील भागात सुरू झाली. त्याचा म्हातारा राजा, म्हणावा असा राजा नव्हता. त्याचे डुगडुगते डोके आहे ते पुढे चालू ठेवत होते इतकेच. साधारणपणे एका प्रभावशाली राज्याचा शेवट आणि दुसऱ्याची सुरुवात यांच्या दरम्यानच्या संधिकाळात नगाला नग असे राज्यकर्ते असतात ना तशांपैकीच होता तो. कंपिली नावाच्या छोट्या राज्याच्या या राजाचे नाव होते कांपिला, 'कांपिला राया'; राजाला प्रादेशिक बोलीत राया म्हणतात. तर, या दुय्यम दर्जाच्या रायाकडे त्याच्या तिय्यम दर्जाच्या सिंहासनावर बसून पंपा नदीच्या किनारी चतुर्थ दर्जाची गढी आणि वेशीच्या आत पंचम दर्जाचे देऊळ बांधण्याइतका वेळ होता. शिवाय त्याच्या राज्यात असलेल्या टेकडीच्या फत्तरांवर भपकेबाज शिलालेख खोदण्याइतके रिकामपणदेखील. मग उत्तरेकडचे सैन्य त्याचा समाचार घेण्यासाठी दक्षिणेत आले. तेव्हा जी लढाई झाली, ती एकतर्फीच झाली. इतकी क्षुल्लक, की त्या लढाईला कोणी नावबिव देण्याच्याही भानगडीत पडले नाही. उत्तरेकडच्या लोकांनी कांपिला रायाच्या बहुतांश सेनेचे शिरकाण केले आणि त्यांनी त्या तकलुपी राजाच्या मुसक्या बांधल्या आणि त्याचे राजमुकुटविहीन शिर उडवले. मग त्यात पेंढा भरून दिल्लीच्या सुलतानाला खूश करण्यासाठी त्याच्याकडे पाठवून दिले. आता त्या निनावी लढाईमध्ये विशेष असे काही नव्हते आणि त्या उडवलेल्या शिरातही. त्या काळी अशा लढाया सतत होत. त्या इतक्या सतत होत की, त्यांना नाव देण्याच्या भानगडीतही बरेचसे लोक बहुधा पडत नसत. आणि या ना त्या राजाच्या खुशीसाठी ही अशी उडवलेली डोकीदेखील आपल्या या थोर भूमीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत प्रवास करीत. उत्तरेकडील राजधानीच्या सुलतानाने अशा मुंडक्यांचा संग्रह केला होता.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्या फुटकळ लढाईनंतर इतिहास बदलून टाकेल, अशी एक घटना घडली. त्या घटनेचा वृत्तान्त सांगितला जातो तो असा, त्या छोट्या पराभूत राज्यातील बऱ्याचशा बायका विधवा झाल्या होत्या. त्या निनावी लढाईचा परिणाम. त्यांनी मग ती चतुर्थ श्रेणीची गढी सोडली, पंचम श्रेणीच्या देवळात अखेरची पूजा केली, छोट्या नावांमधून नदी ओलांडली, नदी ओसंडून वाहत होती; पण तिला न जुमानता त्यांनी पैलतीर गाठला आणि दक्षिण किनाऱ्यावर उतरून पश्चिमेकडे काही अंतरापर्यंत चालत गेल्या. मग त्यांनी मोठी चिता पेटवली आणि तिच्या धडाडणाऱ्या ज्वाळांमध्ये सामूहिक आत्महत्या केली. काहीही तक्रार न करता, पूर्ण गांभीर्याने त्यांनी विनातक्रार एकमेकींचा निरोप घेतला आणि अजिबात न डगमगता ज्वाळांमध्ये प्रवेश केला.

त्यांची शरीरे आगीमध्ये लपेटली गेली, तरी एकही किंकाळी उमटली नाही. फक्त मृत्यूची दुर्गंधी आसमंतात भरून गेली. त्या मूकपणे जळल्या; पेटलेल्या लाकडांच्या ढलप्या तडतडल्या तेवढाच काय तो आवाज ऐकू आला. पंपा कंपानाने ते सर्व घडताना पाहिले. जणू अखिल विश्‍व तिला काही संदेश देऊ पाहत होते. म्हणत होते, 'तुझे कान टवकारून ऐक, मोठा श्‍वास घे आणि शीक यातून काही.' ती नऊ वर्षांची होती आणि घळघळ वाहत्या डोळ्यांनी ते बघत होती, तिच्या आईचे डोळे मात्र कोरडेठाक होते आणि पंपाने तिचा हात घट्ट धरून ठेवला होता. तिच्या ओळखीच्या सगळ्या बायकांनी चितेत प्रवेश केला होता. काही जणी चितेवर चढून बसल्या, काही जणी उभ्या पेटल्या, काही जणी त्या धडाडणाऱ्या भट्टीत निजल्या, त्यांच्याही कानांमधून आणि तोंडातून ज्वाळा लपलपत होत्या. आयुष्यात सगळेकाही बघितलेली म्हातारी आणि नुकतीच जीवनाच्या वाटेवर पाऊल ठेवलेली तरुणी, लढाईत मेलेल्या वडिलांचा तिरस्कार करणारी मुलगी आणि नवऱ्याने युद्धभूमीवर प्राण सोडले नाहीत म्हणून त्याची लाज वाटणारी बायको, मधुर आवाजात गाणारी तशीच खदाखदा हसणारी, वाळक्या काठीइतकी चप्पटकोळ, तशीच टरबुजासारखी गोलमटोल, सगळ्या-सगळ्या बायका त्या चितेत चालत गेल्या. त्यांच्या मृत्यूच्या दर्पाने पंपाला भडभडून उलट्या कराव्याशा वाटल्या. इतक्यात तिला भयानक धक्का बसला, तिची स्वत:ची आई, राधा कंपाना, हलकेच तिचा हात पंपाच्या हातातून सोडवून घेऊन अलिप्तपणे, सावकाश; पण पूर्ण खात्रीने पुढे चालत गेली आणि त्या मृत बायकांच्या चितेमध्ये शिरली, पंपाचा निरोपही न घेता.

पंपा कंपानाच्या- हे नाव खरेतर नदीचेही होते, ज्या नदीच्या काठावर हे सगळे घडले- आयुष्याच्या अखेरीपर्यंत तिच्या आईच्या जळत्या मांसाचा वास तिच्या नाकपुड्या सोडून गेला नाही. चिता चंदनाच्या लाकडांची होती आणि भरपूर लवंगा, लसूण, जिरे आणि दालचिनीच्या कांड्या त्यात टाकल्या होत्या. जणूकाही जळणाऱ्या बायका म्हणजे राजाच्या विजयी सेनानींच्या मिष्टान्ने खाण्याच्या लालसेसाठी बनवली जाणारी मसालेदार पाककृती होती; पण हळद, मोठे वेलदोडे, छोटे वेलदोडे, सगळ्या मसाल्यांचा सुगंध, बायकांना जिवंत शिजवणारा नरभक्षकी चटकदारपणा झाकू शकला नाही. त्या मसाल्यांमुळे त्यांचा तो वास आणखीनच असह्य झाला. पंपा कंपानाने पुढे आयुष्यात कधीही मांस खाल्ले नाही. इतकेच नाही तर, ज्या स्वयंपाकघरात मांस शिजवले जात असेल, तिथे ती क्षणभरही थांबू शकायची नाही. अशा सगळ्या पदार्थांमधून

तिच्या आईच्या आठवणी बाहेर पडत आणि जेव्हा इतर लोक मेलेली जनावरे खात, तेव्हा पंपाला आपली नजर दुसरीकडे वळवावी लागे.

पंपाचे स्वत:चे वडील त्यांच्या तरुण वयातच वारले होते. या निनावी लढाईच्या कितीतरी आधी. म्हणजे तिची आई काही नव्याने विधवा झाली नव्हती. अर्जुन कंपाना इतक्या पूर्वी मेला होता, की पंपाला त्याचा चेहराही आठवत नव्हता. राधा कंपानाने त्याच्याविषयी जे काय सांगितले होते तिला, तेवढेच तिला माहीत होते. म्हणजे अर्जुन कंपाना हा दयाळू माणूस होता. कंपिली गावाचा फार लाडका कुंभार होता. त्याने त्याच्या बायकोला पण कुंभारकीची कला उत्साहाने शिकवली होती, तिला प्रोत्साहन दिले होते. त्यामुळे तो जेव्हा मेला, तेव्हा तिने त्याचा व्यवसाय पुढे नेला. इतकेच नाही, तर त्याच्यापेक्षाही कुशल कारागीर म्हणून तिने लौकिक कमावला. राधाने पंपाच्या हातांनाही अगदी लहानपणापासून मातीकामाच्या चाकावर खेळू दिले होते आणि लहानपणापासूनच पंपा सुरेख भांडी, वाडगे बनवण्यात निपुण झाली होती. त्यातून ती एक महत्त्वाचा धडाही शिकली होती की, केवळ पुरुषांचीच म्हणता येतील, अशी कोणती विशिष्ट कामे नसतात. पंपाला वाटायचे की, ती आणि आई शेजारी-शेजारी बसून त्या चाकावर सुंदर गोष्टी घडवत राहतील, हेच तिचे आयुष्य असणार; पण ते स्वप्न आता संपले होते. तिच्या आईने तिचा हात सोडून दिला होता आणि तिला तिच्या नशिबाच्या हवाली केले होते.

क्षणभर बराच लांब क्षण होता तो- पंपाने स्वत:ची समजूत घालायचा प्रयत्न केला की, तिची आई तिला सोडून चालली नाहीये, ती लोकांबरोबर मिळूनमिसळून राहणारी होती म्हणताना जरा गर्दीमध्ये जाऊन येते आहे, एवढ्या सगळ्या बायका आहेत त्यांना भेटून येते आहे; कारण तिच्या आईसाठी बायकांबरोबरची मैत्री ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट असे. तिने स्वत:ला सांगितले की, ती ज्वाळांची हेलकावणारी जी भिंत होती, तो पडदा आहे आणि सगळ्या बायका त्या पडद्यामागे गप्पाटप्पा करायला जमल्या आहेत आणि गप्पा संपल्या की लवकरच त्या ज्वाळांमधून चालत बाहेर येतील. कोणतीही इजा न होता. कदाचित थोड्याफार होरपळल्या असतील, स्वयंपाकघरातले गंध लपेटून त्या वावरतात, तशाच बाहेर पडतील कदाचित, पण त्या बाहेर पडतील हे सगळे संपवून. मग पंपा आणि तिची आई घरी जातील.

तिने राधा कंपानाच्या देहावरून भाजलेल्या मांसाचे अखेरचे तुकडे गळून पडताना बघितले, निव्वळ हाडे आणि कवटी शिल्लक राहिलेली बघितली, तेव्हा मात्र तिला कळून चुकले की तिचे बालपण संपले. आता याच्यापुढे

आपल्याला प्रौढ व्यक्ती म्हणूनच शहाणपणाने वावरावे लागेल आणि मुख्य म्हणजे आपल्या आईने केलेली ती अखेरची चूक आपण कधीही करता कामा नये. ती मृत्यूची चेष्टा करेल आणि फक्त जीवनालाच सामोरी जाईल. केवळ मेलेल्या पुरुषांच्या मागे परलोकात जाण्यासाठी ती स्वत:च्या शरीराचा त्याग करणार नाही. ती तरुणपणी तर नक्कीच मरणार नाही, त्याऐवजी मृत्यूला खिजवत, अशक्य म्हातारी होऊन जगेल. याच क्षणी तिला स्वर्गीय कृपेचा स्पर्श झाला, त्यातून सगळे आमूलाग्र बदलले; कारण देवी पंपा, जी काळभैरवी आहे, तिचा आवाज नऊ वर्षांच्या पंपाच्या मुखातून बाहेर पडू लागला.

तो विश्वाकारी  आवाज होता. उंचावरून झेपावणाऱ्या प्रपाताचा धीरगंभीर नाद दऱ्याखोऱ्यांतून घुमत राहावा, तसा तो आवाज होता. त्या आवाजात जे संगीत होते, ते तिने यापूर्वी कधीच ऐकले नव्हते. त्या स्वरमेळाला तिने नंतर नाव दिले करुणा. ती अर्थातच भयचकित झाली होती; पण त्याचबरोबर तिला बळ मिळाल्यासारखेही वाटले. भुताने झपाटून टाकावे असे नव्हते ते. त्या आवाजात चांगुलपणा ओतप्रोत भरला होता आणि दिव्यत्वाची प्रचिती त्यातून येत होती. राधा कंपानाने तिला एकदा सांगितले होते की, तिथल्या मंदिरातल्या दोन सर्वश्रेष्ठ देवतांनी त्यांच्या प्रियाराधनाचे सुरुवातीचे दिवस इथेच जवळ कुठेतरी  व्यतीत केले होते. नदीच्या उन्मादी उसळणाऱ्या पाण्याच्या सोबतीने. कदाचित हा आवाज त्याच देवराज्ञीचा असावा. जिथे त्या देवराज्ञीच्या प्रेमाचा जन्म झाला होता, त्याच भूमीचे अखेरचे दिवस भरले होते म्हणून ती परतून आली होती.  पंपा कंपानाचे नावदेखील त्या देवतेच्या नावावरूनच ठेवले होते. 'पंपा' हे पार्वतीच्या अनेक स्थानिक नावांपैकी एक होते आणि तिचा प्रियकर साक्षात शिव, नृत्याचा देव- तांडवकर्ता, तेव्हा त्याच्या स्थानिक त्रिनेत्री अवतारात इथे तिच्यासमोर अवतीर्ण झाला होता हे लक्षात घेता, जे घडले त्याचा अर्थ उलगडत गेला. मानवी पंपा मग अविचल शांत भावनेने, पण अलिप्त मनाने पंपा देवीचे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडताना ऐकू लागली. प्रेक्षकांचे रंगमंचावरील नायकाच्या स्वगतावर जेवढे नियंत्रण असते, तेवढेच तिचे पंपा देवी तिच्या तोंडून वदवत असलेल्या शब्दांवर होते आणि अशा रीतीने प्रेषित आणि चमत्कार घडवून आणणारी बाई म्हणून तिचे जीवितकार्य सुरू झाले.

तिच्या शरीरात काही बदल झाला, असे तिला वाटले नाही. झाल्या गोष्टीचे काही त्रासदायक परिणामही झाले नाहीत. ती थरथर कापली, किंवा तिला चक्कर आली, किंवा शरीरात उष्ण लाटा उसळल्या किंवा घामाच्या थंडगार

धारांनी शरीर गोठले, असे काही झाले नाही. तोंडातून फेस आलाय किंवा शरीर आकडी येऊन कोसळले आहे, असेही नाही झाले. सहसा अंगात देवी आली की असे काही होते, असा तिचा समज होता. दुसऱ्या लोकांच्या अंगात देवी आली की असे झाल्याचे तिने बघितले होते. तिला यापैकी काहीही झाले नव्हते. काही जाणवलेच असेल, तर अंग मऊसूत दुलईत लपेटले जावे, तशी नीरव शांतता तिला वेढून राहिली; हे जग अजूनही चांगले आहे आणि गोष्टी ठीकठाक होतील, अशी खात्री ती शांतता तिला देऊ करत होती.

''रक्त आणि अग्नी यांच्यामधून जीवन आणि सत्ता जन्म घेतील.'' देवी म्हणाली, ''याच ठिकाणी एक प्रख्यात नगर उभं राहील, ते नगर जगातलं एक आश्चर्य म्हणता येईल असं असेल, आणि त्याचं साम्राज्य दोन शतकांपलीकडे टिकून राहील. आणि तू-'' देवीने थेट पंपालाच म्हटले. त्या छोट्या मुलीला प्रत्यक्ष अतिमानवी अनोळखी शक्ती तिच्याशी वैयक्तिकरीत्या बोलते आहे, तिच्याच मुखातून बोलते आहे असा अद्वितीय अनुभव आला. ''बायका परत कधीही अशा प्रकारे जाळल्या जाणार नाहीत याची खात्री देण्यासाठी तू लढशील. शिवाय सर्व पुरुष बायकांचा वेगळ्या प्रकारे विचार करतील यासाठीही तू लढशील. तुझं यश आणि अपयश दोन्हीही बघण्यासाठी आणि त्याची कथा सांगण्यासाठी तुला खूप आयुष्य लाभेल. तुझी कथा सांगून संपली की तू तत्काळ मरशील आणि पुढे चारशे पन्नास वर्षं तू पूर्ण विस्मृतीत जाशील, कोणालाही तुझी आठवण होणार नाही.'' अशा रीतीने पंपाला उमगले की देवाचे वरदान म्हणजे दुधारी तलवार असते.

आपण कुठे जातो आहोत, याचे भान विसरून तिने चालायला सुरुवात केली. ती आपल्या काळात येईपर्यंत जगली असती, तर म्हणाली असती की, हा परिसर अगदी चंद्राच्या पृष्ठभागासारखा दिसतो आहे. तशीच विवरा-व्रणांनी भरलेली सपाटी, कचऱ्याने भरलेल्या दऱ्या, खडकांच्या राशी, तसाच रितेपणा आणि उदास पोकळीची अनुभूती- जिथे खरेतर जीवन भरभरून बहरायला हवे होते; पण चंद्रभूमी कशी आहे, याची तिला अजिबातच कल्पना नव्हती. तिच्यासाठी चंद्र म्हणजे आकाशातला तेजाळ आभेचा देव. ती पुढे-पुढे चालत राहिली आणि तिला वेगवेगळे चमत्कार घडताना दिसायला लागले. तिला एका गरोदर बेडकीला सूर्याच्या दाहाचा त्रास होऊ नये म्हणून तिच्या डोक्यावर आपला फणा पसरून डोलणारा नाग दिसला. शिकार करण्यासाठी पाठलाग करणाऱ्या कुत्र्याच्या समोर सट्‌कन वळून उभा राहिलेला आणि कुत्र्याच्या नाकाचा चावा घेऊन त्याला परत पाठवणारा ससा दिसला. ही अचंबित करणारी दृश्ये

पाहून तिला आतूनच असे वाटायला लागले की, काहीतरी अद्भुत घडू घातले आहे. बहुतेक देवांनीच पाठवलेल्या दृष्टान्ताच्या या विस्मयकारी चिन्हांनंतर ती मंडानामधील एका छोट्या मठाजवळ आली.

मठाला शक्तिपीठही म्हणता येईल; पण एकूणच गोंधळ टाळायचा तर आपण त्याला संन्याशाची मठी म्हणू. नंतर जसा साम्राज्याचा विस्तार वाढायला लागला, तसा मंडानाचा लहानसा मठ भव्य वास्तू बनला. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीकाठांपर्यंत पसरत गेलेली वास्तू. प्रचंड विस्तारलेले संकुल. तिथे हजारो धर्मगुरू, सेवक, व्यापारी, कारागीर, नोकरचाकर, हत्ती सांभाळणारे माहूत, माकडांचे खेळ करणारे माकडवाले, घोड्यांची पागा राखणारे, मठाची विस्तीर्ण शेतजमीन कसणारे शेतमजूर कामाला लागले. ती वास्तू पवित्र तीर्थक्षेत्र मानली जाऊ लागली. तिथे सम्राट सल्ला घेण्यासाठी येऊ लागले; पण आपण आत्ता जिथे आहोत त्या काळात म्हणजे सुरुवात होण्याच्या आधीच्या काळात, ती अगदीच छोटीशी साधी तपस्व्याची गुहा होती आणि भाजीपाला लावलेला जमिनीचा तुकडा. तिथे एक तपस्वी राहत होता. तो तरुण होता. पंचवीस-एक वर्षांचा विद्वान. त्याचे लांब काळे कुरळे केस पाठीवरून खाली कंबरेपर्यंत रुळत होते. त्याचे नाव विद्यासागर, म्हणजे ज्ञानाचा समुद्र. त्याच्या भल्या मोठ्या डोक्यात विद्वत्तेचा समुद्र सतत गाजत असे. त्याने त्याच्या दिशेने येणाऱ्या मुलीला पाहिले. तिच्या जिभेवर भूक होती आणि नजरेत वेड भरले होते. तिला बघितल्याबरोबरच त्याला समजले की, तिने काहीतरी भयंकर घडताना बघितले आहे. त्याने तिला पाणी आणि त्याच्याजवळ जे थोडेफार अन्न होते ते दिले.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# धग

**पेरुमाल मुरुगन**

अनुवाद

**दीपक कुळकर्णी**

पृष्ठे : २०८

किंमत : ३२०

*शहरीकरणामुळे खालावलेल्या जीवनाची आणि ढासळलेल्या जीवनमूल्यांची अस्वस्थ करणारी मांडणी करणारी कादंबरी...*

''मणी, मणी... मणी, मणी ऽ ऽ, मणी ऽ ऽ ऽ ऽ!''

सेल्व्हनच्या हाका हळूहळू मंदावत गेल्या. बराच वेळ जोरजोरात ओरडल्याने बिचाऱ्याचा घसा दुखून आवाजही बाहेर फुटेना. उरात कालवाकालव झाली आणि त्याचे डोळे भरून आले. दात गच्च आवळून त्याने अश्रू थोपवण्याचा

निकराचा प्रयत्न केला, पण त्याला न जुमानता डोळ्यांतून घळघळा पाणी वाहू लागलं. क्षणभर थांबत त्याने दाटून आलेला आवंढा गिळला आणि तो पुन्हा हाका मारू लागला.

आपल्या नावाचा केलेला पुकारा कानी पडताच ते श्वान धावत येत त्याच्यापासून काही फुटांवर धापा टाकत उभं राहिलं. मणीच्या बाहेर लोंबणाऱ्या जिभेतून लाळ टपटप गळत होती. आपलं शेपूट तो इतक्या वेगाने हलवत होता की, कोणत्याही क्षणी ते गळून जमिनीवर पडलं असतं. मणी मग खाली बसून जमिनीवर शेपटीने फटकारे मारू लागला. आधी नाराजी दर्शवण्यासाठी त्याने गळ्यातून एक विचित्र आवाज काढला आणि मग सेल्व्हनवरचं प्रेम व्यक्त करण्यासाठी तो मातीत गडाबडा लोळू लागला.

एव्हाना सेल्व्हन त्याच्यावर इतका चिडला होता की, त्याला मनसोक्त बदडून काढल्याशिवाय त्याचा जीव शांत होणार नव्हता. हलक्या पावलांनी पुढे जात त्याने गपकन मणीची मान पकडायचं ठरवलं. लाडिक आवाजात बोलत तो मणीजवळ जाऊ लागला. एका हाताची मूठ झाकत त्याने त्यात खाऊ ठेवल्याचं मणीला भासवलं आणि आपला दुसरा हात लांब ताणला. पण मणीने त्याचा डाव ओळखला. आपलं मुडपलेलं शरीर चटकन ताठ करत तो दुसऱ्याच क्षणी वीरा रानातील विहिरीच्या दिशेने धावला. त्याला सेल्व्हनच्या हाती स्वत:ला सापडू द्यायचं नव्हतं आणि त्याच वेळी त्याला सोडूनही जायचं नव्हतं. अशा द्विधा मन:स्थितीत मणी अडकला होता.

सायंकाळच्या संधिप्रकाशात वेगाने जाणाऱ्या ट्रक्समुळे रस्ता अचानक उजळून निघत होता. सारं जंगल उजाड होऊन तिथं फक्त गवताची छोटी रोपं उरली होती. काही अंतरावर मोठमोठे वृक्ष आपले असहाय हात पसरत उन्मळून पडले होते. सगळीकडे पडझड सुरू होती. सेल्व्हन रागाने असा खदखदत होता की, त्याला मणीची मुंडीच पिरगाळावीशी वाटत होती. गेले काही दिवस या कुत्र्याबरोबर हाच सिलसिला सुरू होता. सेल्व्हनने कुत्र्याचा पाठलाग करायचा आणि प्रत्येक वेळेस तो त्याच्या हातून निसटून जायचा, हाच खेळ सुरू होता. अरे बाबा, या जमिनीतील आपली सगळी पाळंमुळं आता उखडून टाकली गेली आहेत, हे मणीला कसं समजावून सांगायचं हे त्याला समजत नव्हतं. या जमिनीवर ते आता कणभरही हक्क सांगू शकत नव्हते. मातीचं एक ढेकूळही त्यांच्या मालकीचं राहिलं नव्हतं. त्याला कुत्र्याची भाषा येत नव्हती आणि ती आली असती तरी तो ही गोष्ट मणीला कधीच पटवून देऊ शकला नसता. त्याला वाटलं मणीला जवळ घेऊन त्याच्या कानात सांगावं, 'इतके दिवस ज्यांच्या

अंगावर तू लोळायचास आणि लहान मुलासारखा त्यांच्याबरोबर खेळायचास, ते सगळेजण आता देशोधडीला लागलेत. ज्या घरांसमोर आळस देत तू झोपून राहायचास आणि कुणाचा बारीकसा पायरव कानी पडला तरी दुसऱ्याच क्षणी त्या आवाजाच्या दिशेने भुंकत पळायचास, ती सारी घरं आता उजाड, रिक्त आणि स्तब्ध झाली आहेत. तुझ्यासाठी एकही अन्नदाता उरलेला नाही.' पण मणीला त्याची गंधवार्ताही नव्हती. तो सेल्व्हनच्या कुशीत शिरण्याऐवजी त्याच्यापासून दूर पळत होता.

विचार करून त्याचं डोकं फुटायची पाळी आली. कुत्र्यामागे धावून सेल्व्हन थकून गेला. खूप थकवा आल्याने त्याचा राग हळूहळू निवळू लागला. जवळच देऊळ होतं. देवळाच्या मागच्या बाजूला असलेल्या कठड्यावर तो मागे रेलून बसला. 'जाऊ दे, तो कुत्रा गेला खड्ड्यात. भुकेने मरू दे त्याला.'

गरम वाऱ्याच्या झोतांमुळे सेल्व्हनच्या चेहऱ्याला चटके बसत होते. देवळाच्या प्रवेशद्वाराला लावलेल्या छोट्या घंटा वाहत्या हवेबरोबरच हेलकावत होत्या. त्यातून निघणारा मंद नाद त्याला अंगाई गीतासारखा भासला. अचानक त्याला वाटलं की, पुढच्या बाजूला जाऊन त्या झुलत्या घंटा पाहत मन शांत करावं. लाल रंगाचे दोन लाकडी खांब ओलांडत तो गाभाऱ्यात पोहोचला. शेणाने सारवलेल्या चौथऱ्यावर बंद गजाआड देवाची लहान मूर्ती ठेवली होती. मूर्तीवर वर्षानुवर्षं चढवलेल्या तेलाचे थर अगदी सुकलेल्या शेणासारखे खरखरीत आणि खडबडीत दिसत होते. देऊळही छोटंसंच होतं. आत शिरताच त्याच्या मनात सगळ्या जुन्या आठवणी दाटून आल्या. त्या खोलीत इतर मुलांबरोबर गोल-गोल फेऱ्या मारताना तो भोवळ येऊन अनेकदा खाली पडायचा. इथेच त्याचा पुढचा दात अर्धा तुटला होता. गोल धावताना तो भोवंडून इतक्या जोरात तोंडावर आपटला की त्याच्या दाताचा तुकडाच पडला. त्याचा सगळा चेहरा रक्ताने माखला आणि पोट फुगल्यावर शेळीचं करडू जसं केकाटतं, तसा तो बराच वेळ किंचाळत राहिला होता.

दायमचा खेळ खेळण्यात मोठी माणसं दिवसच्या दिवस वाया घालवत होती. दायम हा काही घराच्या पडवीत, चुन्याचा गिलावा लावून आणि मंडप टाकून खेळायचा बुद्धिबळासारखा किंवा सारीपाटासारखा खेळ नव्हे. गावातील बडी माणसं, तगडे पुरुष गुडघे दुमडून फासा टाकताना दात आवळून ओरडायचे, 'एकाचं दान!' 'आठ आठ पडायला पाहिजे.' 'आता बघ हुकमी सहाचा आकडा काढतो.' सगळा कल्ला चाललेला असायचा. मध्येच कुणीतरी कुत्सितपणे हसायचं. आप्पा जेव्हा जेव्हा हरत तेव्हा ते सोंगटीवर थुंकत व

डोक्याभोवती गोल फिरवून दूर भिरकावून देत. अजूनही चिंचेच्या झाडाखाली नीट शोधलं तर त्या फेकलेल्या सोंगट्या सापडतील आणि आठव्या सोंगटीवर आप्पांचा घामेजलेला चेहरा रागाने थरथरताना दिसेल.

करत्तूरकडून ओडायूरला मिळणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेला ते देऊळ होतं. उत्तरेला जंगलाइतक्या अंतरावर आत्तर वळवू होतं. वळवू म्हणजे घरांचा समूह. रान वाढत वाढत देवळापर्यंत पसरलं होतं. गाव आणि देऊळ यामध्ये फारसं अंतर नसल्यामुळेच मुलांनी खेळण्यासाठी देवळाच्या जागेची निवड केली होती. सुगीच्या हंगामात इकडे एकही माणूस फिरकायचा नाही. देवाची मूर्ती उन्हाच्या झळा सोसत एकटीच उभी असायची. ज्यावेळी पुजारी येऊन थोडं पाणी शिंपडायचा, तेव्हाच त्या मूर्तीला काही वेळापुरता थंडावा मिळायचा. त्या दिवसांमध्ये देवळाची झाडपूसदेखील आठवड्यातून एखाद्या वेळीच व्हायची.

देवळाचं आवार झाडून सडा घालण्याचं काम पाटी करायची. पाटी म्हणजे सेल्व्हनची आजी. त्याबद्दल तिला वार्षिक वेतन मिळायचं. पाटी रोज चिंचेच्या झाडाखाली पडलेली वाळलेली पानं गोळा करून त्यांचे छोटे छोटे गठ्ठे बनवायची. जमीन सारवायला ती फक्त गाईचं शेणच वापरत असे. पाटीच्या मागोमाग घरातील दोन-तीन मुलंही देवळात येत आणि शाळेला उशीर होतोय, लवकर घरी या अशा हाका कानावर येईपर्यंत खेळामध्ये दंग झालेली असत. शाळेला सुट्टी लागल्यावर तर ती मोकाट सुटायची. शेवटी घरातील कोणीतरी येऊन धपाटा घालत त्यांना घरी पिटाळायचं. त्यावेळी पाटी निघून गेल्याचं किंवा सूर्य माथ्यावर आल्याचंही त्यांना भान राहत नसे.

देऊळ मुख्य रस्त्याला अगदी लागूनच असल्याने चालकाचा ताबा सुटलेली एखादी बस किंवा ट्रक देवळाच्या मागच्या भिंतीला हमखास धडकायचा. मग जमलेला दगड-वीटांचा ढिगारा साफ करून त्या जागी पुन्हा भिंत बांधावी लागायची. या सततच्या कष्टप्रद कामाला गावकरी वैतागले होते. माणसाच्या निर्मितीवरच परमेश्वर नेहमी का आघात करतो, असं त्यांना वाटे. कन्हैयाची बस देवळाच्या भिंतीवर धडकली तो प्रसंग मात्र काळीज गोठवणारा होता. ती धडक इतकी जबरदस्त होती की, भिंत भेदून आत घुसलेल्या बसच्या पुढच्या भागाचा पार चेंदामेंदा झाला होता. त्यात अडकलेला चालक जीवाच्या आकांताने विव्हळत, ओरडत होता. पण त्याही अवस्थेत तो शुद्धीत होता. काही जण त्याच्या अंगात घुसलेले पत्र्याचे आणि लोखंडाचे तुकडे कापून त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते, पण दुर्दैवाने त्याच्या शरीराचा निम्मा भाग बाहेर आलेला असतानाच त्याने प्राण सोडला. त्या अपघातात आणखी

चार-पाच जण दगावले. चिनप्पा, आप्पांचा धाकटा भाऊ, त्याही परिस्थितीत दगडमातीचा ढिगारा उपसून आत अडकलेल्यांना बाहेर काढत होता. त्याच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही नव्हता. बाभळीच्या काळ्या खोडासारखं त्याचं शरीर टणक आणि मजबूत होतं. कोणतीही अवजड वस्तू तो विनासायास उचलून फेकून देऊ शकत असे.

आईच्या पदराचं टोक घट्ट पकडून सेल्व्हन एखाद्या पक्ष्याच्या पिल्लासारखा भेदरून उभा होता. त्या भीषण घटनेचा त्याच्या बालमनावर इतका खोल परिणाम झाला की, पुढच्या कित्येक रात्री तो झोपू शकला नव्हता. त्या दिवसानंतर तो इकडच्या भागातही यायला घाबरू लागला. देवळाच्या मागच्या भिंतीजवळ येताच त्याला त्या चालकाच्या किंकाळ्यांचा भास होई. जणू त्या मृत चालकाचा आवाज भिंतीत चिणला गेला होता. इथे एकटा येताना त्याच्या छातीत धडकी भरायची. भूतपिशाचांवर एकदा विश्वास बसला की तो परमेश्वरावर ठेवलेल्या श्रद्धेवर नेहमी मात करतो.

देवळाचं आवार मळणीच्या मैदानासारखं लांब पसरलं होतं. चिंचेची काही बुटुकं जमिनीवर पडली होती. कार्तिगाय उत्सवात याच चिंचेच्या झाडाखाली दिवे लावले जात. शंकूच्या आकारासारख्या दिसणाऱ्या बाजरीच्या टोपांमध्ये ठेवल्याने दिव्याच्या ज्योती प्रखरपणे चमकत. त्यांचा हळुवार स्पर्श चिंचेच्या फांद्यांना व्हायचा. झाडाचं खोड मात्र दिव्यांच्या उष्णतेमुळे काळंठिक्कर पडे. उजवीकडचा चौथरा अनेक पवित्र दगडांनी खच्चून भरलेला होता. त्याच्याभोवती गावातील माणसांच्या हात जोडून उभ्या असलेल्या मातीच्या छोट्या प्रतिकृती फेर धरून उभ्या होत्या. आपलं रक्षण कर, अशी परमेश्वराला त्या प्रार्थना करत होत्या. सेल्व्हन जसजसा त्या आकृती निरखून पाहू लागला, तसं त्याला हसू आवरेना.

त्याला त्यामध्ये आपली आई दिसली. तो आईच्या कडेवर बसला होता आणि तिने अन्ननचे (दादा) आणि आक्काचे (ताई) हात पकडले होते. आईच्या त्या प्रतिकृतीचं नाक तुटल्यामुळे आईचा चेहरा सपाट झाला होता. तिचे दोन्ही हात निखळून पडले होते. त्या प्रतिकृती बनवून जेमतेम तीन वर्षं झाली असतील. इतक्या अल्पावधीतच त्यांची अशी हालत व्हावी? त्या काळात कुठेही बाहेर जाताना आई त्याला तिच्या कडेवर बसवायची. तो आता काही लहान राहिला नव्हता. इयत्ता पाचवीत शिकत होता. एकदा तर त्यांनी मणीसाठीही प्रार्थना केली होती. समोर मणीची प्रतिकृती मात्र अगदी नवी असल्यासारखी चमकत होती. त्यावर एकही डाग पडला नव्हता. जीभ बाहेर आणि शेपटी फुगवलेली


ती आकृती पाहून त्याला तो खराच मणी भासला. त्यावेळी मणीला अंगभर फोड आल्याने तो फार दिवस जगेल याची शाश्वती उरली नव्हती. तो लवकर बरा व्हावा यासाठी सर्वांनी इथे येऊन देवाला साकडं घातलं होतं. या सर्व मूर्तींचा शिल्पकार होता, पंडकरण. तो पाळलेल्या कुत्र्यांच्या गळ्यात नेहमी पट्टा दाखवायचा, पण त्याने मणीचा गळा रिकामाच ठेवला होता. कदाचित आप्पांनी त्याच्यापाशी मणीचं वर्णन केलं असणार. पंडकरणने मणीची प्रतिकृती त्याप्रमाणे हुबेहूब बनवली होती. सेल्व्हनला क्षणभर त्या मूर्तीच्या पाठीवरून हात फिरवण्याचा मोह झाला. त्याने पंडकरणच्या कलेला मनापासून दाद दिली.

देवळाच्या अगदी जवळ आणि वीरा रानाला लागूनच तोंड आ वासलेली एक मोठी विहीर होती. देवळाचा विहिरीवर काहीच हक्क नव्हता, पण सेल्व्हनच्या आजोबांच्या धाकट्या भावाने विहिरीतील पाणी देवळासाठी वापरायची परवानगी दिली होती. विहीर पाहिली की प्रत्येक वेळेस त्याला वल्ली आक्का आठवायची. पुरुषांच्या लुंगीसारखी नेसलेली साडी वर खोचून ती शेतात पाटानं पाणी सोडण्यासाठी विहिरीतून सपासप पाणी खेचायची. लग्न झाल्यावर आक्का गाव सोडून गेली. मग ना जंगल राहिलं, ना पाटपाणी.

मणी अजूनही विहिरीच्या कठड्यावर बसला होता. तो सेल्व्हनजवळ यायलाही तयार नव्हता आणि मणीला पकडणं त्यालाही जमत नव्हतं. 'तो असाच पळत राहिला तर अखेर इथेच हवेत विरून जाईल.' सुरुवातीपासूनच आपण त्याच्या गळ्यात पट्टा बांधायला हवा होता. पण आप्पांचा त्या गोष्टीला विरोध होता. 'मणीच्या गळ्यात पट्टा घालायची काही गरज नाही. पट्टा नसला तरी तो पळून नाही जायचा' असं आप्पांनीच त्याला सुनावलं होतं. अर्थात त्याला मोकळं सोडणंही एका प्रकारे योग्यच होतं. मणी नेहमी शिस्तीत वागायचा. समोर वाढलेलं अन्न चाटून-पुसून स्वच्छ करायचा आणि जिथे शेळ्या बांधलेल्या असायच्या, त्यांच्या बाजूला आपला मुक्काम ठोकायचा. त्यामुळे त्याला रात्री बांधून सकाळी सोडायची कधी गरजच भासली नाही. काही वेळा मात्र तो थोडे नखरे करायचा. कुणी त्याला बाहेर घेऊन गेलं असलं की त्याला लवकर घरी परतायचं नसे. मग तो हुलकावणी देत राहायचा. सेल्व्हनच्या हातात पट्टा दिसला नाही तरी ज्या प्रकारे तो मणीला साद घालायचा, त्यावरून आपल्याला घरी नेण्याचा त्याचा इरादा आहे हे बरोबर ओळखून तो सेल्व्हनला चांगलाच झुलवत ठेवायचा.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# झिंगू लुखू लुखू

**बाबाराव मुसळे**

पृष्ठे : १५६
किंमत : २४०

*हुंड्याचा काळराक्षस असो वा लाग्नासंबंधी इतर जाचक प्रथांवर प्रहार करत भारतीय समाजरचनेचं अस्वस्थ करणारं चित्रण मांडणाऱ्या कथा...*

### दावणीचा बैल

''सईऽऽ'' आवाराच्या दारामव्हरं आल्या आल्या रामकिसनानं बाहेरून हाक मारली. ''बार्शाव्होऽऽऽ प्च्चॉ, प्च्चॉ, प्च्चॉऽऽऽ'' म्हणत बैलाचे कासरे आवरून धरले. तसा बार्शानं आदिकीचाच जोर काढला. ''याच्या मायले मी काय मनोतं! भर्तीच्या गाडीले नाही असा जोर

काढत बाबून्या? तव्हा त ढुंगणात शेपूट घालून मांघं मांघं दडतं. अन् आता गठ्ठ्या खायाचा त कसा मव्हरं मव्हरं ताण मारतं? एरव्हीबी खायाले टकराद्यो अन् कामाले लागोच हाये गद्धडीचा.''

यशोदानं आतून दाराची कडी काढली. रामकिसनानं तिच्याकडे पाहिलं. उनात तापलेल्या लाल तमाट्यावाणी तिचं तोंड सुकलं होतं.

''कावं काहून? दुकते गिकते का काही?''

''........'' यशोदाने नुसती मान हलवली. अन् दारातून मागं सरली.

''भाकर लावनं काहून?'' रामकिसनानं जोर काढणाऱ्या बार्शाची येसन धरून म्हटलं.

त्यानं म्हटल्यावर ती लगबगा घरात गेली. रामकिसनाला तिचं नवलं वाटलं. कव्हाबी आपण बैलं घेऊन आलो की आवाराची कडी काढल्याबरोबर ती आंधी बैलाह्मले भाकर लावते. तसे बैलं घरात आणू देत नाही. अन् यंधवा तीच इसर्ली? नक्कीच काही तरी चईंतर बिघडलं तिचं.

यशोदानं घरातून भाकर आणून एक कोर बार्शाला अन् एक कोर मंगळ्याला लावली. मंगळ्या बार्शापेक्षा लयच आश्राब जनावर. खायाले द्या, नका देऊ; कामात तिळभराचा कुचरपणा करणार नाही. गाडीले लावा, औताले लावा; हालकं, भारी कोणतंही काम असो, कव्हायबी बार्शाच्या मव्हरंच दोन हात  राहील. रामकिसनानं बैल आवारात आणले. दावणीला बांधले. पऱ्यावरच्या दोन गवताच्या पेंढ्या सोडून त्यांच्यासमोर टाकल्या. तव्हरक यशोदा आवाराच्या दारातच उभी होती, त्याच्या हालचालीकडे मरगळलेल्या नजरेनं पाहत होती.

''लाव नं दार,'' रामकिसनानं म्हटलं, तेव्हा तिनं दार लावलं.

रामकिसनानं नांदीवर पाय धुतले, तोंड धुतलं, धोतराच्या पदरानं तोंड पुसत तिच्याकडे पाहिलं. तिचं असं मुकं मुकं राहणं कशासाठी ते त्याला कळेचना. एरवी कुठूनही तो घरी आला की तिची रिकाट आपोआप सुरू व्हायची. तसंच यंधवाबी ती विचारंल, 'जेवारी किती आणली? सरकी, बी-बियाणं बरोबर आणलं? एकदाणीचे किती पैसे आले?' ...पण यंधवा जणू जिभंहून वारं गेलं.

''कावं काहून मुकी हायेस, मुकं राह्याचं वर्तं धरलं का काय?'' तो

तिच्याकडे पाहून हसत म्हणाला, पण तिच्या चेहऱ्यावर मात्र बारीकशी वळीही पडली नाही. ती बैलांकडे पाहत होती. बार्शा मंगळ्याले शिगानं ढुसन्या मारत होता.

''पाव्हणा आला,'' ती आइसक्रोटावाणी थंडीगार.

''कोण?''

''सईचा सासरा.''

''सईचा सासरा?'' तो माठ्यानं बोलला. त्याचा पाय जणू अचानक सापावर पडला. आता त्याचं तोंडही तिच्यावाणी एकदम सुकलं.

''कव्हा आला?'' मराय टेकलेल्या माणसावाणी त्याचा आवाज खोल झाला.

''दुपाराच,'' यशोदेचा चेहरा रबरावाणी ताणत गेला. रोवलेल्या खुटाडासारखे दोघे जणं जागच्या जागी किती तरी वाढोळ उभे राहिले.

लांब सुस्कारा टाकून रामकिसना घरात आला. त्याच्या मागोमाग यशोदाही आत आली. त्यानं प्यायला पाणी मागितलं. तिनं तांब्या भरून दिला ''सई कुठीसा गेली,'' पाणी पिता पिता त्यानं विचारलं.

''निजली''

''काहून?''

''हिव आलं मनून,'' हातचा तांब्या तिला देत त्यानं कोपऱ्यात टाकलेल्या बाजेकडे पाहिलं.

''कव्हापासून हिवं येयालं?'' एरव्ही रामकिसनाला घर भारल्यावाणीच वाटू लागलं

''पाव्हणा आला तव्हापासून,''

''आँ,'' त्यानं कपाळावर आढ्या चढविल्या. असा कसा मनावं पाव्हण्याचा पायगुण? घरातल्या समद्या माणसाह्यले जणू त्याच्या पायी लागण झाली.

''सईऽऽ'' आवाज देत रामकिसना बाजंजवळ गेला. सईनं अंगाभोवताल पांघरूण गुंडूनमुंडून घेतलं होतं. तोंड मात्र उघडंच होतं. यशोदाप्रमाणं तिचंही तोंड सुकलेलं होतं. त्यानं तिच्या कपाळावर हात ठेवला. कपाळ थंडगार होतं.

‘‘सई, झोप लागली का?’’

‘‘नाही, जागीच हाओ,’’ अंगावरचं पांघरूण सरकवलं.

‘‘पांघरूण काहाले काढतं?’’ रामकिसनानं आपल्या हातानं पुन्हा तिच्या अंगावर पांघरूण टाकलं.

‘‘घाम आला मले,’’ म्हणत तिनं ते पुन्हा काढलं.

‘‘पुस मंग,’’ रामकिसना तिच्याजवळ बसला. उठून बसल्यावर तिनं साडीच्या पदरानं घाम पुसला.

‘‘खाल्लं व्हतं इनं काही?’’

‘‘------’’ यशोदा खाली मान घालून उभी होती.

‘‘च्याहाम्याहा पेलता?’’ त्यानं सईला विचारलं. तीही मान वाकडी करून मायकडे पाहत राहिली. आर्बा, मोकळं मोकळं बोलायलेबी कोणीच राजी नाही. समद्याह्मच्या मनात निऱ्हा आढ्याचआढ्या पडलेल्या दिसायल्या. तो मनाशीच बोलला.

‘‘मले काहीच नाही पाह्यजे बा. आता मी नाही झोपत,’’ ती उठू लागली.

‘‘आवं, तसं नको करू. झोप मुकाट्यानं,’’ त्यानं तिला हाताला धरून बसविलं.

‘‘मी नाही बरं, कंटाळा येते निजू निजू.’’

‘‘आंग दुखायलं मनल्यावर...’’ पण रामकिसनाला पुढं बोलू न देता सई म्हणाली, ‘‘माहा नाही दुखायला आंग.’’

रामकिसनाला त्याच्या बोलण्याचा मतलब कळेना. त्यानं कपाळावर आढ्या पाडल्या. ‘‘मंग...’’

‘‘मंग काय मंग इनंच निजवलं तव्हाचं मले,’’ सईनं यशोदाकडे पाहत तणक्यानं म्हटलं. त्यानंही यशोदाकडे पाहिलं. खाली मुंढी घालून ती पायाच्या अंगठ्यानं जमीन उकरत होती. हे काय चालू आहे ते त्याला कळेना. तो बुचकाळ्यात पडला.

‘‘मंजे?’’ त्यानं यशोदाला विचारलं.

अगोदर यशोदा काहीच बोलली नाही. क्षणभर त्याच्याकडे टक लावून पाहत राहिली. मग तिनं त्याला प्रश्न केला. ‘‘पाव्हण्यानं उंद्या इले नेयाचं

मनलं त काय सांगसाल त्याले?''

''मले नाही कळलं.''

''आवं तं उंद्याच पाव्हण्यानं इले नेतो मनले त कशी आणसाल इची एकदाणी?''

''हां,'' रामकिसनाच्या डोक्यात आता उजेड पडला. अस्सं हाये तर हे! आता समद्या गोष्टी त्याच्या लक्षात आल्या. त्यानं यशोदाकडे पाहिलं अन् त्याचा ऊर भरून आला. कित्ती हुशार हाये. पाव्हणा आला तव्हापासून ह्योच विचार चालू असंल तिचा खरंच... खरंच...

पण? त्याला शंका आली ती त्यानं बोलून दाखविली,

''पाव्हण्यानं नेतोच मनलं त?''

''बीमार हाये मनल्यावर कसा नेईल?''

''तरीबी त्यानं मनलं नेतोच, त मंग?''

''तसा बरा मनंल,'' यशोदाचा जीव कोंडाळल्यासारखा झाला.

त्यातून सुटका करून घेत ती म्हणाली, ''पोरीचं आंग दुखायला मनल्यावर तसा कसा नेईल? तिचं आंग दुखायचं राह्यल्यावर आणून घालतो मनावं चार-आठ दिवसानं. तव्हरक आपली पेडीबी भेट्टे. पेडीचे पैसे मिळाले की एकदाणी सोडवून आणता येते.''

''ते बी खरंच हाये.'' त्यालाही तिचं म्हणणं पटलं. त्यामुळं त्याचं मन रूवावाणी हलकं झालं. बांडीशीच्या खिसातला भातक्याचा पुडा काढून त्यानं सईला दिला. बाजेवरून उठत म्हणाला, ''पाह्यतो सकारामचे पोतडे काहाडणं झाले का नाही ते गाडीतले आपले पोते त्याच्या पोत्याखाली हायेत. आणा लागतील घरी.''

''बा, आता मी नाही झोपेत बरंऽऽऽ!'' सई लडकुंड्या येऊन म्हणाली. तशी यशोदा वाघिणीसारखी चवताळून तिच्या अंगावर धावली.

''आवं तं झोपणं मुकाट्यानं उंद्या पाहाटलोकं. एकदा त्या पाव्हण्याचं काळंपांढरं झालं मंग फिर गावभर. आता तू फिरशील आन् पाव्हण्याले तुह्या गळ्यात एकदाणी दिसली नाही काय मनंल त्यो?''

''मनू दे काहीबी. मी नाही झोपत आता जाय, तिकडं.''

''मंग जीव द्यायले लावतं का त्याह्यले? का तूही एकदाणी सोडवून

आणायसाठी डाका टाकावं कुठीसा? आसं काय माहीत व्हतं माय, यंधवाच पवाडंल मनून. तसं आदुगरच कळलं असतं तं आपली कशीय चोदवली असती. काहाले पोथ ठेवत व्हतं माणूस,'' यशोदा जवळजवळ लडकुंड्या आली.

तिची समजूत घालत रामकिसना म्हणाला, ''त्या पाव्हण्याले काय माहीत व्हतं असं व्हईल मनून.''

''नव्हतं माहीत. मंग का आखाडी झाल्यावर येऊ नव्हतं त्याले? जशा का भाकरीच भेटत ना त्याले. चालला बोंबलत इथिसा.''

''चाल्लंच हाये, त्याह्यचं माणूस त्याह्यनं कव्हाय नेतो मनलं त आपणाले ना कसं मनता येईल?''

''तुमचं त कव्हायबी तसंच,'' यशोदानं तणक्यानं वळका मारला. ''त्या कारकुन्याचं बी मडं जायेना डंगडंग वाजत. कव्हा देते पेडी त्याच्या मायच्या दसव्याले का तेरशाले ते...''

रामकिसनाला तिची कीव आली. आपलाच दाम खोटा, दुसऱ्याले दोष देण्यात काय अर्थ? त्याला घरात उभं राहणं अशक्य झालं. यशोदाचा तळतळाट त्याला पाहावला गेला नाही. असं काही झालं की, ती जिवाचा खूप वैताग करते, अन् मग रडत बसते. हे त्याला माहीत होतं. म्हणून तो काहीच न बोलता घराबाहेर पडला. बाहेर आल्यावर त्याला ध्यान आलं, ''पाव्हणा कुठीसा हाये?'' त्यानं दारातूनच विचारलं.

''मोठ्याच्या घरी गेला चहा पियाले.''

रामकिसनाला वाटलं, आदुगर पाव्हण्याले भेटावं. पण मग आणखी विचार बदलून तो सखारामच्या घराकडे निघाला.

सई रामकिसनाची एकुलती एक पोरगी. तसे यशोदेला सईच्या आधी दोन व नंतरही दोन लेकरं झाले, पण देवाच्या मनात नसंल. ते झाले तसेच मातीआड करायचं काम पडलं. पुढं एखादं दोन किडूकमिडूक व्हायचं तर तिचा विटाळच बंद झाला. गंजाड खटपट करून पाहिली. पण जमलं नाही.

मागच्या चैत्रात सईचं लग्न केलं. सोयरा चांगला भेटला. घरचा बराबुरा. आठ बैलांची भोय असणारा. त्यात त्याला दोनचं पोरं. रामकिसनानं पाच हजार रुपये हुंडा देतो म्हटलं ते त्या पाव्हण्यानं मान्य केलं. पाव्हणा तसा

नात्यातलाच होता म्हणून त्यानं फार ताणलं नाही. तरीही लग्न, हुंडा यामुळं रामकिसनाचं पेचकाड मोडलं. तो घाणीत आला.

हिंगं आता आखाड सरला. मिरगाचे सुदे दोन ठोक पडले. ज्यांचं ज्यांचं बी-बियाणं तयार होतं त्यांनी पेरण्या सुरू केल्या, पण रामकिसनाची सरकी, बी-बियाणं अजून बाजारातच होतं. पैशाचीच सोय नव्हती. त्यात पेडीबी लवकर भेटेना. बरं, कोणाला चार पैसे मागावे तर काही मांडून द्या म्हणतात. मांडून तरी काय द्यावं? घरावरचे चार टपरं, का नाडापुडीइतकी असलेलं वावरं? ते मांडून तर द्यावं तर मग रहावं कुठं, खावं काय? आजकाल पैशाच्या व्यवहारात कोणाचा कोणाला भरवसाच राहिला नाही.

कालच्या रात्री दोघं नवरा-बायको असाच विचार करत बसले होते. काय करावं, कस करावं? पेडीची तरी किती दिवस वाट पाहावी? लोकं पेरायले निघाले तरी आपण पेडीपेडी करत किती दिवस थांबावं?

बोलताबोलता सईकडे पाहत यशोदानंच गोष्ट काढली,

''कावं, आखाडी आठ-दहा दिवस राह्यली.''

''हं, मंग?'' त्यानं उलट विचारलं.

''आखाडी व्हवस्तोर पाव्हणा थोडाच सईले नेयाले येते?''

''नाही येणार? त्याचं काय करायचं?''

''मले वाटते. सद्याचं भागवायसाठी सईची एकदाणी ठेवली कोणाजवडे तं नाही जमणार?''

रामकिसनानं सईकडे पाहिलं. ती कावरीबावरी होऊन त्याच्याकडे पाहत होती.

यशोदा पुढं विचार सांगू लागली, ''जे काय पैसे येतील त्याच्यात किंटलखांड जवारी आणावं, सरकी, बी-भरणं आणावं. आखाडीलोकं पेडी भेटली की तिची एकदाणी सोडवून आणता येते.''

रामकिसनानं फार आढेवेढे न घेत ही गोष्ट मान्य केली.

यशोदाबरोबच सईनंही त्याला आग्रह केला.

आणि आज रामकिसनानं तसंच केलं. गाडी जुंपून तो सकाळीच वाशिमला गेला. सराफाजवळ पोत ठेवून बी-भरणा, ज्वारी घेऊन गावाकडे परत आला. तर ही बोंब. आता का जीव द्यावा माणसानं? नसता तो

आपल्या, यशोदाच्या अन् सईच्याही जिवाला ताप. आपलं, यशोदाचं काही असो, पण सईला नाहाकच झोपायचं काम पडायलं. दुखणं आल्याचं सोंग करायचं काम पडायलं. इतकंही करून पाव्हण्यानं 'ठेवतो' म्हटलं तर ठीक अन् 'नेतो' म्हटलं तर? नुसत्या विचारा-विचारानं रामकिसनाचा श्वास गळ्यात अटकला.

संध्याकाळी जेवणं झाल्यावर रामकिसनानं पाव्हण्याला वसरीत बाज टाकून दिली. आपण स्वत: खाली भिंतीला पाठ टेकून बसला. त्यांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी सुरू झाल्या.

पाव्हण्याचं अन् रामकिसनाचं जेवण आटोपल्यावर यशोदानं सईला सोबत घेऊन पोटात चार घास लोटले. सईच्या मदतीनं पसारा आवरला. हे सारं करताना तिचा कान वसरीत चाललेल्या गाष्टीवरच होता. अजून तरी पाव्हण्यानं गोष्ट काढली नव्हती.

ती पानाला चुना लावत दरवाजाआड बसली. आता त्या दोघांच्या सगळ्या गोष्टी स्पष्ट ऐकता येत होत्या. भिंतीला पाठ टेकून बसलेल्या रामकिसनाला ती पाहू शकत होती, पण पाव्हण्याला ती किंवा तिला पाव्हणा दिसत नव्हता. नव्या नव्या व्याह्यासमोर जाऊन बसणंही बरोबर नव्हतं ना!

तिनं पानाची घडी करून ते तोंडात घालण्यासाठी ओठाजवळ नेलं अन् ते तोंडात जाण्याऐवजी जागीच राहिलं. कारण तेव्हाच पाव्हण्यानं गोष्ट काढली होती. ''उद्या नेतो सईले. पाह्यटी लवकर आटपायले सांगा.''

पाव्हण्याची गोष्ट ऐकून रामकिसनाचा जीव धडधडला. तो काहीच बोलला नाही. त्यानं दाराआड बसलेल्या यशोदाकडे पाहिलं. पान खायाचं विसरून ती त्याला हातानं, डोळ्यानं खुणावत होती. तरीपण बोलायची त्याला हिंमतच होईना. त्याचा नरडाच सुकून आला. यशोदाला रामकिसनाचा भलताच राग आला... तव्हाचं इतलं सांगतलं, सवरलं तरी बी बुवा मुकाच. एऱ्हीबी आऊतपाड्याच माणूस हाये ह्यो. तो तसा ऐकत नाही हे पाहून त्याच्यावर तिनं डोळे वासले. रागावल्यासारखं केलं. तरीही रामकिसनाच मोघं बेरलेलच राहिलं. आता मात्र तिला दम निघाला नाही. जागच्या जागीच सावरून बसल्यासारखं करीत ती हसतहसत बोलली. ''आत्ता तुम्ही सईले नेता मनता. पण तिचंत अंग दुखायलं.''

‘‘आँ, अंग दुखायलं? कव्हापासून?’’ पाव्हण्यानं कपाळावर आढी पाडली.

‘‘दोन दिवस झाले,’’ आता मात्र रामकिसना बोलला.

‘‘काय दुखते मनाव?’’ पाव्हण्यानं चौकशी केली.

‘‘हिवताप, दुसरं काय?’’

‘‘काही देलं दवापाणी?’’

यावेळी उत्तर देण्याऐवजी रामकिसनानं यशोदाकडे पाहिलं. त्याचा मतलब तिच्या लक्षात आला. म्हणून ती पटकन म्हणाली,

‘‘हो तं, गावातल्या डॉक्टरजवळून इंजिक्शन, गोळ्या घेतल्या.’’

‘‘आर्बा, मंग तं लयच भोंबारा झाला मनायचा,’’ पाव्हण्यानं डोकं खाजवित म्हटलं.

‘‘अँ, त्यातनी काय भोंबारा व्हायाचा हाये?’’ रामकिसना पोसलेल्या मिठ्ठूवाणी बोलला. ‘‘तिचं अंग दुखायचं राहिल्यावर आणून घालीन मी चार-आठ दिवसानं.’’

यावेळी पाव्हणा काहीच बोलला नाही. पाव्हणा काय म्हणतो ते ऐकायसाठी यशोदाचा जीव लयच हारकिजला.

‘अं, तसं का कराना, घाला आणून तिचं अंग दुखायचं राह्यल्यावर,’ असंच पाव्हणा म्हणेल याची तिला खात्री होती.

‘‘काहाले मांघून आणून घालता? आत्ताच नेतो मी तिले. पेरणी-पाण्याचे दिवस. त्यात आमच्या घरची पंढरीच्या जत्रंले जातो मनते. भाक्री-कोल्ड्यासाची सोय तं पाहा लागंल.’’

पाव्हण्याच्या ह्या बोलण्यानं दोघा नवरा-बायकोचा दम कोंडल्यासारखा झाला. त्याच्या फुग्यातील हवाच काढून घेतली जणू पाव्हण्यानं. सईनंही बाजेवर आडोंग बदलला. त्यामुळं बाज कुरकुर वाजली.

‘‘पण तिचं दुखण्याचं अंग?’’ यशोदा सईकडे पाहत बोलली.

‘‘अं, त्याले काय व्हते? जाता जाता वासमात दाखविन डाक्तरले,’’ पाव्हण्यानं खुटा हलवून पक्का केला. रामकिसनानं खालच्या आवाजात पुनः म्हणून पाहिलं. पण पाव्हण्यानं नकार दिला. आता नाहक हेलपाटे घेण्यात अर्थ नाही हे ध्यानात आल्यावर यशोदा वक्टडक तोंड करून उठली.

रामकिसनाच्या उरातली धडधड वाढली. आता काय करावं? कशी सोडवून आणावं सईची एकदाणी? त्याच्या डोळ्यासमोर गव्हाळ्या नागावाणी सईची एकदाणी लहऱ्या मारू लागली.

रातभर डोळ्याला डोळा लागला नाही-रामकिसनाच्या, यशोदाच्या अन् सईच्याही.

पहाटं रामपहाऱ्यात गुळूना करून रामकिसनानं गावात चक्कर टाकली. दिवस धांदभर वर आला. तेव्हा चिमणीवाणी तोंड करून घरी आला. दो जुलमानं अंग धुऊन त्यानं पाव्हण्यासोबत चार घास पोटात घातले. ''यंधवाच्या दिवस राहा, उंद्या जा,'' असं पाव्हण्याला सांगून तो घराबाहेर पडला.

दिवसभर यशोदाला घर जणू खायला उठलं. दुपारी पाव्हणा बाहेर गेला होता. तेव्हा सईनं गरगर डोळे भरून आणले. तेव्हा तिची समजूत घालायची सोडून ती उलटी तिच्यावर खेकसली,

''काय झालं व तुले भरल्या घरात दाडासाडावाणी लडायले? तुही माय मेली का बाप?'' आणि तिच्या अशा बोलण्यानं सई हुंदके देऊन रडायली लागली. नकळत यशोदाचेही डोळे पाणावले.

जेवणवेळ टळून गेली तरी रामकिसनाचा पत्ता नव्हता. मनात नसूनही यशोदानं पाव्हण्यासाठी पुरणपोळीचा पाहुणचार केला होता. रामकिसना लवकर येत नाही हे पाहून तिनं एकट्या पाव्हण्यालाच जेवायला वाढलं. पाव्हण्याचं जेवण झाल्यावर त्याला वसरीत बाज टाकून दिली. तिनं सईला जेव म्हटलं, पण 'बापू आल्यावर जेवतो,' असं ती म्हणाली. मग दोघा मायलेकी उरावर मणामणाचे दगडं ठेवून रामकिसनाची वाट पाहू लागल्या.

रात्री किती तरी उशिरा रामकिसना घरी आला. ''झोप लागली काहो?'' असे म्हणून पाव्हण्याला त्यानं हाक मारली, पण पाव्हण्याला खरंच झोप लागली होती. तो आला हे पाहून सई व यशोदा पटकन जागच्या उठल्या.

''काहून इतका उशीर केला?'' पाय धुऊन घरात आल्यावर यशोदानं रामकिसनाला विचारलं.

''अं झाला. पाणी दे आदुगर. मोकळ्या मनानं धनवरवाणी पाणी पिऊ दे.'' त्याच्या मनावरचा ताण आता अजिबात गेला हे पाहून त्या

दोघी मायलेकींना बरं वाटलं. पाणी प्याल्यावर खिशातली लाल झिरमळ्या कागदाची पुडी सोडून सईच्या समोर एकदाणी धरून तो म्हणाला, ''हं घे बाई तुही पोथ.''

ते पाहून यशोदाच्या अंगावर सरसर काटा उभा राहिला.

''पणं हे कुठून...?'' तिला बोलताही आलं नाही.

''मंग सांगीन समदं. घे सई, गळ्यात घाल. माहा जीव आता बिनघोर झाला.''

सईनं, हुंदका देत पोथ गळ्यात घातली.

''सई, मुकी लडू नको. चार दिवस घाणीचे असतातच कोणाचेबी. जातील आमचे हेबी दिवस. राहणार थोडेच हायेत?''

रामकिसनानं तिला समजावलं. रामकिसनानं सईची समजूत घातली, पण यशोदा? ती आतल्याआत आक्रंदत होती.

खुटीवरचा झोऱ्या घेऊन त्यानं त्यातली नवी साडी काढली.

ती सईसमोर धरीत म्हणाला, ''रंग-बिंग, पदर-काठ पाहाय बाई तुह्या मनपसंत हाये का? झंपराले पीस आणायचं ध्यानच राह्यलं नाही गड्या.''

यशोदाला हे समदं आक्रितच वाटू लागलं. पोथबी आणली, साडीबी आणली. कुठून? काय केलं असंल? तिचा जीव टांगणी लागला.

रामकिसनाला, सईला जेवायला वाढून ती सईसोबत जेवायला बसली. पण अन्नावरची तिची वासनाच उडाली होती.

अर्धवट जेवण टाकून ती मध्येच उठली.

रात काळासारखी सरकली.

दुसऱ्या दिवशी सईला वाटी लावताना यशोदा भलतीच रडू लागली. सईही रडू लागली. ''काय झालं व लडायले तुले?'' बायका यशोदाला बोलू लागल्या. ''ती का वनवासात हाये का? तिच्या नशिबानं तिले राजधानी भेटली बरं मांय?'' बायकाचं म्हणणं खरं होतं. सईला सासरी कशाचीच उणीव नव्हती. पण यशोदेच्या रडण्याचं खरं कारण त्या बायकांना काय माहीत? रान पेटलं जन पाहाते, मन पेटलं कोण पाहाते म्हणतात ते काय खोटं आहे?

''यसोदे, आवर्तं घे, चाल आटप, नाही तं गाडी हुकंल पाव्हण्याची,''

असं तिच्या भायानं म्हटलं. तेव्हा रडणं मारोतीच्या शेपटवाणी आखडलं.

सईला मोटारीत बसवून रामकिसना परत घरी आला, तेव्हा त्याच्यासोबत एक नवाडा माणूस होता. रामकिसनानं तिला आवाराचं दार उघडायला सांगितलं. तिनं दार उघडल्यावर ते दोघं आत आले. यशोदा कपाळावर अढी चढवून त्या माणसाकडे पाहत होती. तिच्या काहीच ध्यानात येईना. हा माणूस कोण? कशासाठी आला?

रामकिसना सरळ बार्शाजवळ गेला. त्याच्या पाठीवर थाप मारून त्यानं त्याला चोंभाळलं. अन् मग त्याचा गळ्याचं बिल्डं सोडून त्या माणसाजवळचं चऱ्हाट लावलं. ते पाहून यशोदेच्या मनात लक्कन वीज चमकली. पटकन पुढं येत तिनं विचारलं, ''काय हाये हे? काहून बैल सोडला?''

''इकला त्याह्यले,'' रामकिसनानं चऱ्हाट त्या माणसाच्या हाती दिलं.

''नाही, बैल नाही इकायचा, सोडा चऱ्हाट,'' आणखी पुढं होऊन तिनं बार्शाची येसण धरली.

तो माणूस बावरला. ''काहो कसं?'' त्यानं रामकिसनाला विचारलं.

''व्हय व बगलंन, नेऊ दे बैल त्याह्यले.''

''नाही व्हतं, दावणीचा बैल इकून कुणबीक बुडवता का काय?''

''पाहू मव्हरचं मव्हर, आपलं जसं व्हईल तसं व्हईल.''

''नाही, दुसरं काहीबी इका, पण बैल नाही नेऊ देत.''

''दुसरं काय हाये इकायले? नेव्दे. आपलं जसं जळलं तसं जळू दे. त्याह्यले मधात अडथळा नको करू.''

''नाही तं राहू द्या बॉ,'' तो माणूस मध्येच म्हणाला.

''बाईचं मनच नाही इकायचं मनल्यावर. माहे काल घेतलेले पैसे मले वापस द्या.''

''नाही, जबान मंजे जबान, सोड व येसण, चाल व्हय बाजूले,'' रामकिसनानं तिच्या हातातील येसण सोडवून घेतली अन् तिला मागं लोटलं.

''नका माय, बार्शाले नका इकू. सईवाणी जीव लावला त्याच्यावर,'' तिला हुंदका आला. तिचं म्हणणं खरं होत, पण वेळ साजरी करायची म्हटल्यावर चांगुणासारखा पोटचा गोळा तुडवावा लागतो.

त्या माणसानं चऱ्हाट धरून बार्शाला ओढलं, पण बार्शा जागचा हलला

नाही. रामकिसनानं पाठीवर थाप मारून त्याला हाणलं, पण छे. शेपूट धरून पाह्यलं. तरी बार्शा जागीच. ‘हाणा मांघून’ म्हणत त्या माणसानं जोर खाऊन चूहाट ओढलं. मग रामकिसनानंही शेपूट धरून मोडलं. तशी बार्शानं फाडकन लाथ मारली. ती नेमकी रामकिसनाच्या टोंगळ्यावर बसली. त्याच्या अंगाची अंगार झाली. तो कावला. पऱ्याला अडकविलेलं एक निबर काटूक उपसून त्यानं जल्मात पहिल्यांदा अंगात असंल नसंल तेवढं बळ काढून बार्शाच्या पाठीत एकामागून एक सपके हाणायला सुरुवात केली. बार्शा भ्यॉ भ्यॉ वरडू लागला.

‘‘नका मारू माय,’’ यशोदानं हंबरडा फोडला.

पण तिचं न ऐकता आवाराच्या दारालोक रामकिसनानं बार्शाला सपकावत आणलं. बार्शा दाराबाहेर पडला. अन् रामकिसनाच्या हातातलं काटूक आपोआप गळून पडलं. अंगातलं बळ नाहीसं झालं. अन् तो दारातच मटकन खाली बसला. त्याच्या डोळ्याला झरझर धारा लागल्या होत्या.

दावणीचा दुसरा बैल-मंगळ्या सांड्यारांड्या लेकरावाणी काकुळती येऊन एकदा फुंदुफुंदु रडणाऱ्या यशोदाकडे अन् एकदा अश्रू गाळणाऱ्या रामकिसनाकडे पाहत होता.

**अनुष्टुभ दिवाळी - ८०**

(रेडू-कथा स्पर्धेतील तृतीय पुरस्कारप्राप्त कथा)

(ही कथा अमरावती/औरंगाबाद विद्यापीठात अभ्यासाला होती.)

◆

## १६ जानेवारी २०२६ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत**

**१६ जानेवारी - नानी पालखीवाला यांचा जन्मदिन**
'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल'या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८४५/- । सवलत किंमत ५९२/-**

---

**१६ जानेवारी - मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन**
'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन**
'कांगारू देशीच्या गोष्टी'(४ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१९ जानेवारी - अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'रेड टेप'या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**२१ जानेवारी - डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन**
'पूजाघर', 'काया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**२१ जानेवारी - पॉल ॲलन यांचा जन्मदिन**
'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

---

**२१ जानेवारी - रमेश जोशी यांचा जन्मदिन**
'अंतर्नाद' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत २०८/-**

---

**२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन**
'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**२३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती**
'नेताजी','नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ५१७/-**

**२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिन**
'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११७५/- । सवलत किंमत ७७९/-**

**२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिन**
'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-**

**२३ जानेवारी - चार्ल्स ग्लास यांचा जन्मदिन**
'ते एकाकी लढले', 'डेझर्टर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ६७५/-**

**२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन**
'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**२५ जानेवारी - अश्विन सांघी यांचा जन्मदिन**
'दि व्हॉल्ट ऑफ विष्णू', 'दि रोझाबल लाइन', 'द कृष्णा की', 'सियालकोट गाथा', 'माझदाचे जादूगार', 'कालचक्राचे रक्षक', 'चाणक्याचा मंत्र', 'रेझर शार्प' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४५१४/- । सवलत किंमत ३५६६/-**

**२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन**
'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५३२०/- । सवलत किंमत ३४५८/-**

**२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिन**
'लेडिज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९२०/- । सवलत किंमत ६०२/-**

**२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन**
'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २८०/-**

**२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन**
'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०४/-**

**२८ जानेवारी-डॉ.अरुणा कौलगुड यांचा जन्मदिन**
'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझेन्टेशन स्किल्स', 'जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २०९/-**

**२८ जानेवारी-डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन**
'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**३०जानेवारी-पिंकी विराणी यांचा जन्मदिन**
'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११३५/- । सवलत किंमत ७९५/-**

**खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत**

**१ फेब्रुवारी-सोफी लगूना यांचा जन्मदिन**
'वन फुट राँग' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिन**
'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच ॲन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-**

**३ फेब्रुवारी-दीप्ती नवल यांचा जन्मदिन**

‘द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिन**

‘गर्भसंस्कार’,‘स्थूलतेला करा टाटा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३९०/- । सवलत किंमत २६२/-**

**४ फेब्रुवारी-फेसबुक डे**

‘द फेसबुक इफेक्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिन**

‘आकाशवेध’,‘जन्मठेप’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत १८९/-**

**८ फेब्रुवारी-जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिन**

‘अ टाइम टु किल,’ ‘द असोशिएट’, ‘द चेम्बर’, ‘द क्लायंट’, ‘द फर्म’, ‘द पेलिकन ब्रीफ’, ‘द रेनमेकर’, ‘द पार्टनर’, ‘द रनअवे ज्यूरी’, ‘द लास्ट ज्यूरर’, ‘द टेस्टामेंट’, ‘द स्ट्रीट लॉयर’, ‘द ब्रोकर’, ‘द इनोसंट मॅन’, ‘द रॅकेटिअर’, ‘सिकॅमोर रो’, ‘द लिटीगेटर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ९०५९/- । सवलत किंमत ४६९२/-**

**८ फेब्रुवारी-अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन**

‘पटना ब्लूज’, ‘मोतिहारीचा माणूस’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ८००/- । सवलत किंमत ५५३/-**

**१० फेब्रुवारी-अजित जाधव यांचा जन्मदिन**

‘वास्तु-अजित’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३७९/-**

**१० फेब्रुवारी-राधिका टिपरे यांचा जन्मदिन**

‘वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-**

**११ फेब्रुवारी-स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिन**

‘फिश!’, ‘फिश! फॉर लाइफ’, ‘फिश! स्टीक्स’, ‘फिश! टेल्स’ या पुस्तकांच्या

संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९०/-**

**११ फेब्रुवारी-सिडनी शेल्डन यांचा जन्मदिन**
'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

**१२ फेब्रुवारी-दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन**
'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०७/-**

**१२ फेब्रुवारी-वैदेही यांचा जन्मदिन**
'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-**

**१२ फेब्रुवारी-राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन**
'कहाणी पहिल्या आगीनगाडीची', 'इंडियाज रेल्वेमॅन' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४७७/-**

**१३ फेब्रुवारी-कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन**
'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-**

**१४ फेब्रुवारी-व्हॅलेंटाइन डे**
**संच १** -'चिकन सूप फॉर द कपल्स सोल', 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी', 'प्रेमाची परिभाषा','अनादि-अनंत','अद्वैत','आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद','चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग– १ आणि भाग-२' 'पीस, लव्ह अॅन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्‌कंडिशनल लव्ह', 'देवदास', 'टू सर विथ लव्ह' या पुस्तकांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४८९०/- । सवलत किंमत ३३०८/-**
**संच २** -'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-**

♦



# राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT) आयोजित पुणे ग्रंथ-महोत्सवातील क्षणचित्रे




RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/01/2026 Posting Date : 11/01/2026

## आवर्जून वाचावं

शिवरायांची लक्षवेधी
जीवनगाथा असलेल्या

**महासम्राट**

कादंबरी मालेतील तिसरे पुष्प




लेखक - विश्वास पाटील

लोकसहभागातून
विकसित भारतासाठी
रचलेला पाया

**गिनीजगाथा**




लेखक - राजेश पांडे

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________